www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ३० ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, बुधवार, ०५ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### "राहुल गांधींच्या पदयात्रेनं देशातील चित्र बदललं, 'हम करे सो कायदा' वृत्तीला चोख उत्तर" - नाना पटोले

● मुंबई, नितीन देवळेकर :

"लोकशाहीमध्ये जनता हीच सर्वश्रेष्ठ असते. जनतेपेक्षा कोणीही मोठा नाही, जे लोक स्वतःला सर्वात मोठे मानत होते, 'हम करे सो कायदा' या पद्धतीनं वागत होते, अशा प्रवृत्तीला जनतेने लोकसभा निवडणुकीत चांगलाच धडा शिकवला आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले आहे. देशात परिवर्तनाचा संदेशही महाराष्ट्रानेच दिला आहे," अशी प्रतिक्रिया प्रतिक्रीया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. केंद्रातील १० वर्षांच्या अहंकारी, तानाशाही व्यवस्थेला ही मोठी चपराक असल्याचंही ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या कलांवर टिळक भवन येथे पत्रकार परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी पटोले बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा असलेल्या महाराष्ट्राने खोक्याची व्यवस्था चालत नाही हे दाखवून दिलं असल्याचं ते म्हणाले. "संविधानाला पायदळी तुडवत राज्यातील मविआचे सरकार पाडलं, लोकशाही व संविधानाचा अपमान केला त्यांना जनतेने या निवडणुकीत चोख उत्तर दिलं आहे. महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष एक नंबरचा करण्याचा संकल्प केलेला आहे, त्याची ही सुरुवात आहे. देशात नरेंद्र मोदींपेक्षा कोणी मोठा नाही, त्यांना कोणी अडवणार नाही या अहंकारी वृत्तीला जनतेने मोठी चपराक दिली आहे. राहुल गांधी यांच्या कन्याकुमारी ते काश्मीर व मणिपूर ते मुंबई पदयात्रेने देशातील चित्र बदलून टाकलं व जनतेनं राहुल गांधी यांना मोठं जनसमर्थन दिले. या पदयात्रेनं नरेंद्र मोदींशिवाय देशात नेता नाही यालाही उत्तर दिले व राहुल गांधी यांच्या गॅरंटीवर देशातील जनतेनेच शिक्कामोर्तब केले. लोकसभा निवडणुकीतील हा विजय काँग्रेस व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा आहे," असंही नाना पटोले म्हणाले.

# मुंबईतील १७ मॉल्सना बजावल्या नोटिसा, मालाडमधील मॉल असुरक्षित घोषित



● मुंबई, दिगंबर जाधव :

पालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाने २६ ते ३० मे या कालावधीत मुंबईतील ६८ मॉलची अचानक तपासणी केली. या तपासणीत अग्निसुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या १७ मॉल व्यवस्थापनांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस बजावलेल्यांपैकी एक असलेल्या मालाड पश्चिम येथील मॉलमध्ये सोमवारी ३ जून रोजी आग लागली. याची गंभीर दखल घेत अग्निशमन दलाने हा मॉल असुरक्षित घोषित करून कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे.

मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी आणि उपायुक्त प्रशांत गायकवाड यांनी मुंबई अग्निशमन दलास महापालिका हद्दीतील मॉल्सची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

'मेसर्स द मॉल' या मॉलला मागील आठवड्यात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. सोमवारी याच मॉलमध्ये आगीची दुर्घटना घडली.'मेसर्स द मॉल' या मॉलला मागील आठवड्यात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. मालाड पोलिस ठाण्यामार्फत हा मॉल रिकामा करण्यास व अभियोग दाखल करून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

- संतोष सावंत, प्रमुख अग्निशमन अधिकारी (प्रभारी)

पान २ वर

# मुंबईत 'नोटा'ची ताकद !

## महायुती, महाविकास आघाडीचे उमेदवार वगळता इतर उमेदवार फिके

● मुंबई, यश सावंत :

लोकसभा निवडणुकीत 'नोटा'ची ताकद मोठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबईतील सहा लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडी आणि महायुतीचे उमेदवार वगळता इतर एकाही पक्षाच्या ना अपक्षाला नोटापेक्षा जास्त मिळू शकलेली नाहीत. तब्बल ७२ हजार १९२ नोटाने मते घेतली आहेत. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांशिवाय मैदानात सक्षम उमेदवार नसल्याने मतदारांनी 'वरीलपैकी कोणीही नाही' म्हणजेच नोटाचा पर्याय निवडत आपले बहुमोल मत दिले आहे.



निवडणूक रिंगणात मतदाराला सक्षम किंवा त्यांच्या पसंतीचा उमेदवार नसेल तर आपले मत कोणाला मत द्यायचे असा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाने २०१४ पासून नोटाचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. त्यानुसार २०१४ आणि २०१९ मध्ये मतदारांनी नोटाला पसंती दिली होती. मात्र यंदा मुंबईच्या सहाही मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडीने सक्षम उमेदवार दिले होते. यामुळे २०१९ च्या तुलनेत २०२४ च्या निवडणुकीत नोटाला काहीसे कमी मतदान केले असले तरी एकूण झालेल्या मतदानाचा विचार करता मागील वर्षीच्या तुलनेत नोटाला जास्त मते मिळाली आहेत. २०१४ मध्ये नोटाला ५२ हजार ९५८, २०१९ मध्ये ८२ हजार २७५ मतदारांनी मुंबईत नोटाला मतदान केले होते. महायुती आणि महाविकास आघाडीचे उमेदवार वगळता निवडणूक रिंगणात तिसरा कोणीही सक्षम उमेदवार नव्हता. त्यामुळेच प्रमुख पक्षाचे दोन उमेदवार वगळता तिसरा सक्षम उमेदवार निवडणूक रिंगणात नव्हता. त्यामुळे मतदारांनी आपले मत इतर कोणत्याही उमेदवाराला न देता नोटाला दिले आहे.

पान २ वर

# महामुंबईत भाज्यांनी ओलांडली शंभरी, फरसबीचे दर आठपट वाढले

● नवी मुंबई, भावना जैन :



मुंबई, नवी मुंबई परिसरामध्ये भाजीपाल्याचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. फरसबीचे दर एक आठवड्यात आठ पट वाढले आहेत. होलसेल मार्केटमध्ये १६० ते १८० व किरकोळ मार्केटमध्ये २५० ते २८० रुपये किलो दराने फरसबी विकली जात आहे. वाटाणा, गवार, घेवडा, दोडक्यानेही किरकोळ मार्केटमध्ये शंभरी ओलांडली असून, कोथिंबीरची एक जुडी ६० रुपयांना विकली जात आहे. तीव्र उन्हाळा व पाणी टंचाईमुळे भाजीपाल्याचे उत्पादन कमी झाले आहे.

पान २ वर

# एचएएलचे सुखोई लढाऊ विमान नाशिकमध्ये कोसळले; पायलट सुखरूप

● नाशिक, विशाल पाटील :

एचएएलचे सुखोई लढाऊ विमान सरावादरम्यान अचानकपणे तांत्रिक बिघाड झाल्यामुळे निफाड तालुक्यातील शिरसगाव येथील एका द्राक्षबागेच्या शेतामध्ये कोसळले. सुदैवाने या दुर्घटनेत पायलट बालंबाल बचावले.



पायलट अगोदरच विमानातून पॅराशूटद्वारे खाली उतरल्याने किरकोळ दुखापत झाली. घटनास्थळी पिंपळगाव बसवंत पोलिसांचे पथक व एचएएलचा चमू पोहचला आहे.

एचएएलचे सुखोई-३०एमकेआय या लढाऊ विमानाचा सरावस सुरू असताना मंगळवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास अचानकपणे विमानात तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने पायलटने विमान अतीउंचीवरून खाली आणण्यास सुरूवात केली.

पान २ वर

# ठाण्यातील पब, हुक्का पार्लर त्वरीत बंद न केल्यास भाजपा छेडणार आंदोलन !

● ठाणे, रोहित जैसवाल :



ठाणेजिल्ह्यातील ठिकठिकाणी सुरू असलेले अनधिकृत पब, हुक्का पार्लर त्वरीत बंद करून १० वाजेनंतर सर्व वाईनशॉप बंद करावी. त्यामुळे ठाणेकर युवा पिढीचे संभाव्य नुकसान टाळता येईल, अशी मागणी भाजपा आमदार संजय केळकर, ठाणे जिल्हा शहर अध्यक्ष संजय वाघुले, भाजपाचे युवा मोर्चाचे सुरज दळवी यांनी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. आठ दिवसात धडक कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.

पुण्यात घडलेल्या कार अपघातामुळे राज्यात खळबळ उडाली आहे. समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुण्यातील या घटनेची पुनरावृत्ती ठाणे जिल्ह्यात होऊ नये, त्यासाठी त्वरीत उपाययोजना हाती घेण्यात याव्या. याशिवाय पब, हुक्का पार्लर त्वरीत बंद करून १० वाजेनंतर सर्व वाईनशॉप बंद करण्याची धडक कारवाई जिल्ह्याभरात करण्यात यावी अन्यथा त्या विरोधत आठ दिवसात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपाने जिल्हाधिकाऱ्याना दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.

पान २ वर

# ठाकरेंच्या मालकीच्या 'ड्रमबिट'ला ठोकलं टाळं, पुणे पॉर्शे अपघातानंतर ॲक्शन

● मुंबई, विशाल कारंडे :

ठाकरे कुटुंबियांची मालकी असलेल्या ड्रमबिटला प्रशासनाकडून टाळं लावण्यात आलं आहे. पुण्यातील पॉर्शे अपघाताच्या घटनेनंतर प्रशासनाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईविरोधात मुंबईतील पब्ज आणि बार मालकांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. यानंतर हायकोर्टाने राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. याप्रकरणी बुधवारी 5 जूनला तातडीची



सुनावणी होणार आहे. माधवी बिंदूमाधव ठाकरे यांनी सरकारच्या या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही याप्रकरणी याचिका दाखल करून राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्याची नोटीस जारी केली आहे. आता 5 जूनच्या सुनावणीमध्ये नेमकं काय होणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. ठाकरे कुटुंबियांची मालकी असलेल्या 'ड्रमबिट' सह मुंबईतील विविध बार आणि रेस्टॉरंट मालकांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागानं केलेल्या कारवाई विरोधात ठाकरे कुटुंबाच्या माधवी बिंदूमाधव ठाकरे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर, तातडीची सुनावणी घेण्याचं मान्य करून उच्च न्यायालयानं राज्य सरकारला नोटीस बजावली आहे.

पान २ वर

# राज्यात एक्झिट पोल सपशेल फेल, देशाचे अन् राज्यातीलही अंदाज चुकले

● कोल्हापूर, सचिन कदम :

निवडणूकपूर्व आणि मतदानानंतर विविध संस्थानी जाहीर केलेले एक्झिट पोल मतदारांनी फोल ठरवले. जवळपास सर्वच संस्थांनी भाजप स्वबळावर बहुमत मिळवून महायुती ३५० ते ४०० जागा जिंकेल असे अंदाज वर्तवले होते. राज्यात महायुतीच्या जागा काहीशा कमी झाल्या तरी २५ ते ३० जागा जिंकतील असा अंदाज होता. पण, राज्यात इंडिया आघाडीने मुसंडी मारून एक्झिट पोल खोटे ठरवले. अनेक ठिकाणी निकालात उलथापालथ झाल्यामुळे सट्टेबाजार मात्र मालामाल झाला.




मतदानाचा सातवा टप्पा पूर्ण होताच देशभरातील विविध संस्थांनी त्यांचे एक्झिट पोल जाहीर केले. बहुतांश एक्झिट पोलमध्ये भाजप स्वबळावर सत्ता मिळवण्याचा दावा केला जात होता. तर देशभरात महायुती ३५० ते ४०० जागा जिंकेल असे चित्र दाखवले जात होते. इंडिया आघाडीला कुणीच फारसे जमेत धरले नाही. केवळ १२४ ते १६० जागा इंडिया आघाडीच्या पारड्यात जातील असा अंदाज बांधला होता. टीव्ही९-पोलस्ट्रॅट वगळता अन्य संस्थांनी राज्यात महायुतीला पसंती दिली होती. एकमेव टीव्ही९-पोलस्ट्रॅटने महायुतीपेक्षा इंडिया आघाडी जास्त जागा जिंकेल असे भाकीत केले होते. राज्यात एक्झिट पोल सपशेल फेल ठरले.

या निकालाने सट्टा बाजारात मात्र मोठी उलाढाल केली. भाजपला एकहाती बहुमत मिळवता आले नाही. उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्रात भाजपची कमालीची पिछेहाट झाली. अनेक ठिकाणी अनपेक्षित निकाल लागले. यामुळे सट्टा बाजारात बुकी मालामाल झाले. सट्टा बाजारात फेव्हरेट ठरलेले काही उमेदवारही पराभूत झाल्याचे दिसत आहे. हातकणंगले लोकसभा मतदार संघात याची प्रचिती आली. बहुतांश संस्थांनी राज्यात महायुतीला फेव्हरेट ठरवले होते. भाजप १७ ते २२ जागा जिंकेल, तर काँग्रेसला केवळ ३ ते ८ जागा जिंकता येतील असा अंदाज संस्थांनी वर्तवला होता. प्रत्यक्षात मात्र काँग्रेसने १३ जागा जिंकत सर्वांचेच अंदाज चुकीचे ठरवले. भाजपला ११ जागांवर समाधान मानावे लागले. ठाकरे गटानेही १० जागा जिंकून मुसंडी मारत एक्झिट पोल फोल ठरवले.

# भाजप लोकसभेत बहुमतापासून दूर!

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लोकसभा निवडणुकीच्या मंगळवारी जाहीर झालेल्या मतमोजणीत भारतीय जनता पक्ष (भाजप) 241 जागांवर आघाडीवर आहे. 543 जागांवर होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवण्यासाठी 272 चा जादुई आकडा पार करावा लागेल. पण, एनडीए युती आपल्या सर्व सहकारी घटकांसह 291 जागांसह सरकार बनवताना दिसत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पहिली प्रतिक्रिया आली आहे. देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा एनडीएवर विश्वास व्यक्त केला आहे. भारताच्या इतिहासातील हा अभूतपूर्व क्षण आहे. या प्रेम आणि आशीर्वादासाठी मी माझ्या कुटुंबियांना प्रणाम करतो. मी देशवासियांना खात्री देतो की त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही नवीन ऊर्जा, नवीन उत्साह आणि नवीन संकल्प घेऊन पुढे जाऊ. मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो आणि



सर्व कार्यकर्त्यांनी केलेल्या समर्पण आणि अथक परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करतो.

आतापर्यंतच्या ट्रेंडनुसार भाजप अडचणीत असल्याचे दिसत आहे. एनडीए जवळपास 290 जागांवर आघाडीवर असून त्यापैकी 240 जागा भाजपच्या वाट्याला जात आहेत. याचा अर्थ पंतप्रधान मोदींच्या तोंडावर निवडणूक लढवणाऱ्या भाजपला यावेळी स्वबळावर बहुमत मिळवता येणार नाही. अशा परिस्थितीत सरकार चालवण्यासाठी मित्रपक्षांच्या दयेवर अवलंबून राहावे लागेल. निर्णय घेताना पक्षाला तोटा सहन करावा लागू शकतो.

## संपादकीय

# प्रीपेड मीटर्स कोणाच्या फायद्यासाठी?

महावितरण कंपनीकडून ग्राहकांना 'प्रीपेड स्मार्ट मीटर' ची सक्ती सुरू झाल्याने त्याची ग्राहकांमध्ये प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविकच होते. सध्या स्मार्ट मीटर्स बसविण्यात आली आहेत. या मीटरमध्ये ग्राहकांनी महिन्याला केलेल्या वीजवापरानुसार दर आकारणी केली जाते. प्रीपेड स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकांनी आगाऊ जमा केलेल्या रक्मेएवढीच बीज वापरता येईल. मोबाइलप्रमाणे स्मार्ट प्रीपेड मीटरसाठी ग्राहकांना रिचार्ज करावा लागेल. जेवढी खात्यात रक्कम जमा तेवढी वीज वापरता येईल. विजेचा किती वापर झाला याची सारी माहिती ग्राहकांना त्यांच्या नोंदणी केलेल्या मोबाइलमध्ये बघता येईल. वीजचोरीला आळा घालण्याकिता प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याची योजना असल्याचा महावितरण कंपनीचा दावा आहे. कोणत्याही क्षेत्रातील सुधारणांचे स्वागतच केले पाहिजे. पण त्या करताना ठरावीक लोकांना झुकते माप देत ग्राहकांवर बोजा टाकला जात असल्यास नागरिकांमध्ये प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक आहे. लोकसभेचे मतदान पार पडताच नागपूर, वर्धा आदी भागांमध्ये प्रीपेड मीटर्स बसविण्यास सुरुवात झाल्याने स्थानिक नागरिकांचा विरोध सुरू झाला. काही ठिकाणी तर आंदोलनाचा इशारा देण्यात आला. राज्यात ऑक्टोबर महिन्यात

विधानसभेची निवडणूक अपेक्षित आहे. अशा वेळी वीज ग्राहकांची नाराजी परवडणारी नाही. कारण दैनंदिन जीवनाशी निगडित मुद्द्यांवर निर्माण होणारा असंतोष मतदानातून व्यक्त होत असतो. ऊर्जा खाते हे भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडे. यामुळे भाजपची दुहेरी कोंडी झाली आहे. कारण 'स्मार्ट प्रीपेड मीटर'साठी एकीकडे केंद्राचा दट्ट्या तर दुसरीकडे ग्राहकांत नाराजी पसरण्याची भीती. यावर राज्यातील भाजपच्या मंडळींनी उपाय शोधून काढला. प्रीपेडऐवजी ग्राहकांना पोस्टपेड प्रणाली बसविण्याचा पर्याय देण्यात येणार आहे. म्हणजेच प्रचलित पद्धतीनुसार किती वापर झाला तेवढा आकार भरावा लागेल. पण ही तात्पुरती मलमपट्टी आहे. विधानसभा निवडणुकीत वीज मीटरच्या मुद्द्याची धग बसू नये म्हणून हा उपाय काढण्यात आला आहे. कालांतराने प्रीपेड प्रणालीतच रूपांतरित केले जाईल. ग्राहकांना सवय झाल्यावर टप्प्याटप्प्याने प्रीपेड प्रणालीत रूपांतरित करण्याचा हा तोडगा आहे. विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यावर प्रीपेड प्रणाली अमलात येणार हे स्पष्टच आहे. निवडणुकीत

मतांसाठी ग्राहकांना तात्पुरता दिलासा दिला जातो. यापूर्वी २००४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांसाठी मोफत विजेचा निर्णय तत्कालीन कॉंग्रेस सरकारने राज्यात घेतला होता. पण पुन्हा सत्तेत आल्यावर आर्थिक बोजा वाढू लागताच मोफत विजेचा निर्णय फिरविण्यात आला होता. हाच प्रकार प्रीपेड प्रणालीबाबतीत होऊ शकतो.

प्रीपेड स्मार्ट मीटरची सक्ती केंद्र सरकारकडूनच राज्यांना करण्यात येत आहे. केंद्राच्या ग्रामीण विद्युतीकरण कॉर्पोरेशन आणि पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन या दोन कंपन्यांनी वीज प्रणालीतील सुधारणांसाठी महावितरणला २६ हजार कोटी तर 'बेस्ट' उपक्रमाला चार हजार कोटींचे कर्ज मंजूर केले आहे. कर्जासाठी प्रचलित मीटर्स बदलून प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याची अट घालण्यात आली आहे. यानुसार महावितरण कंपनीने मीटर्स बदलण्यास सुरुवात केली. ही मीटर्स बदलणे किंवा नवीन बसविण्याकरिता ग्राहकांकडून पैसे आकारले जाणार नाहीत, असा महावितरण कंपनीचा दावा आहे. पण प्रीपेड मीटर बसविण्याचा बोजा ग्राहकांवर पडेल अशी भीती महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेकडून व्यक्त केली जाते. ही भीती निरर्थक नाही. प्रीपेड मीटर बसविण्याचे काम अदानीसह काही बड्या कंपन्यांना मिळाले आहे. यापैकी ठाणे, नवी मुंबई, कल्याणमधील काम हे अदानी कंपनीला देण्यात आले आहे. आर्थिकदृष्ट्या फायद्यातील भांडुप विभागही एका बड्या उद्योग समूहाला आंदण देण्याचा सरकारच्या पातळीवर प्रस्ताव चर्चेत आहेच. प्रीपेड मीटर्स बसविल्याने वीजपुरवठ्याच्या सद्यःस्थितीत बदल होणार का, हे महत्त्वाचे. राज्याच्या ग्रामीण भागात थोडासा पाऊस शिंपडला गेला तरी वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार आजही घडतात. गेल्याच आठवड्यात वळवाच्या पावसाने अनेक भागांत वीज खंडित झाल्याच्या तक्रारी आल्या होत्या. वीजपुरवठ्यातील गळती १५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात वीज कंपन्यांना यश आले असले तरी शहरांबरोबरच ग्रामीण भागातही अखंड वीजपुरवठा सुरू राहील या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.



### आजची चित्रोळी

मुठभर सुद्धां पुरली असती
पानभर कशाला वाढलीत हो !
घमघमाट तर येवढां सुटलाय
छातीत सगळ्या भरलाय हो !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

पान १ वरून...

### मुंबईतील १७ मॉल्सना बजावल्या नोटिसा,...

त्यानुसार मुंबई अग्निशमन दलाच्या विशेष पथकाने ६८ मॉलची तपासणी केली. या मॉल्सपैकी ४८ मॉलमध्ये अग्निप्रतिबंधक उपाययोजनांची व सुरक्षेची पूर्तता करण्यात आल्याचे पथकाच्या निदर्शनास आले, तर १७ मॉल व्यवस्थापनांनी अग्निसुरक्षा नियमांचे पालन केले नसल्याचे आढळले. त्यामुळे या १७ मॉल्सला महाराष्ट्र अग्निबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना २००६ अन्वये नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच या ३० दिवसांत आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी सांगण्यात आले आहे.

### महामुंबईत भाज्यांनी ओलांडली शंभरी,...

मुंबई बाजार समितीमध्येही आवक कमी होऊ लागली आहे. सोमवारी ५४५ ट्रक, टेम्पोमधून २८१८ टन भाजीपाल्याची आवक झाली. त्यामध्ये ४ लाख जुडी पालेभाज्यांचा समावेश आहे. एक आठवड्यापूर्वी बाजार समितीमध्ये फरसबी २० ते २४ रुपये किलो दराने विकली जात होती. आता हेच दर १६० ते १८० रुपये किलोंवर पोहोचले आहेत. घेवडा २० ते २४ रुपयांवरून ४० ते ५० रुपयांवर गेला आहे. वाटाणा ३४ ते ४० वरून ९० ते १०० रुपये किलोवर पोहोचला आहे.

पालेभाज्यांचे दरही वाढू लागले आहेत. शेपू बाजार समितीमध्ये ३० ते ५० रुपये जुडी व किरकोळ मार्केटमध्ये ५० ते ६० रुपयांचा विकली जात आहे. कोथिंबिरीच्या जुडीचे दर बाजार समितीमध्ये १५ ते ५० जुडीपर्यंत पोहोचले असून, किरकोळ मार्केटमध्ये एका जुडीसाठी ६० रुपये मोजावे लागत आहेत. पुढील काही दिवस बाजारभाव तेजीत राहतील, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### एचएएलचे सुखोई लढाऊ विमान...

विमान एचएएलच्या धावपट्टीच्या दिशेने लॅण्डिंगसाठी नेण्याचा प्रयत्न वैमानिकांकडून केला जात होता; मात्र तत्पुर्वीच विमान निफाड तालुक्यातील शिरसगावातील एका शेतात कोसळले. या दुर्घटनेत संपुर्ण विमान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. यावेळी आजबाजुच्या पंचक्रोशीमध्ये मोठा आवाज झाल्याने परिसरातील रहिवाशांनी शेताच्या दिशेने धाव घेतली. शेतामध्ये आग लागल्याने अग्नीशमन दलालाही पाचारण करण्यात आले आहे. विमान कोसळल्यामुळे वीजताराही तुटून पडल्या होत्या. संपुर्ण शेतात आगीच्या ज्वला व धूराचे लोट उठत होते. विमानात दोन वैमानिक होते, असे आजुबाजुच्या लोकांनी सांगितले. दोन्ही वैमानिकांनी प्रसंगावधान राखून अगोदरच पॅराशुटच्या सहाय्याने खाली झेप घेतल्याने सुदैवाने ते बचावले.

### ठाण्यातील पब, ऊका पार्लर त्वरीत बंद न...

मनमानीपणे सुरू असलेले पब, ऊका पार्लर, बीअर बार आदींमुळे युवा पिढीचे नुकसान होत आहे. पुण्यात घडलेल्या घटनेत पहाटेच्या सुमारास दारूच्या नशेत असलेल्या विकासकाच्या मुलाने दोन निष्पःप मुलांचे बळी घेतले आहे. असा प्रकार आपल्या ठाण्यात घडू नये म्हणून आपण पब, ऊका पार्लर, रात्री १० नंतर चालू असणारे वाईनशॉपवर त्वरीत कारवाई करण्याची मागणी भाजपाने लावून धरली आहे.

### ठाकरेंच्या मालकीच्या 'ड्रमबिट'ला ठोकलं...

पुण्यातील पोर्शे प्रकरणानंतर अनेक कारणांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अनेक बार आणि पब्जचे परवाने निलंबित किंवा रद्द करून या आस्थापनांना टाळी ठोकली जात आहेत. या याचिकेची दखल घेत त्यावर राज्य सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश देत हायकोर्टानं यावर बुधवारी सुनावणी ठेवली आहे. तसेच तुमच्या आस्थापनांत काय चालतं याचीही आम्हाला कल्पना आहे, त्यामुळे कुणीही इथं साळसूदपणाचा आव आणू नये, अशी हायकोर्टानं याचिकाकर्त्यांची कानउघडणीही केली आहे. पुण्यातील अपघाताची घटना घडल्यापासून कागदपत्रे न देता पहाटेपर्यंत सुरू असणाऱ्या मुंबईतील बार आणि रेस्टॉरंटचे परवाने निलंबित केले जात आहेत. मात्र राज्यात कुठे तरी, काही तरी घडलंय म्हणून आम्हाला लक्ष्य करत बळीचा बकरा बनवंल जातंय, असा दावा बार आणि रेस्टॉरंट मालकांच्यावतीनं वकील वीणा थडानी यांनी हायकोर्टात केला आहे. ड्रमबिट, लायन्स हार्ट, सारथी, गुडलक, साई श्रद्धा यांसह इतर काही बार आणि रेस्टॉरंट मालकांनी दाखल केलेल्या याचिकांवर न्यायमूर्ती कमल खता आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर सुनावणी झाली.

27 मे रोजी ही कारवाई करण्यात आली असून 10 दिवसांकरता या अस्थापना सील करण्यात आल्या असून अधिकाऱ्यांनी मागितलेली आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत की नाही, याची खात्री करण्याची सूचना हायकोर्टानं याचिकाकर्त्यांना केलेली आहे. कारण, आवश्यक ती कागदपत्रं सादर केल्यानंतरही बाजू ऐकून न घेता परवाने निलंबित किंवा रद्द केले जात असल्याचं थडानी यांनी हायकोर्टात सांगितलंय.

### मुंबईत 'नोटा'ची ताकद !...

त्याला दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघातील अबुल हसन खान आणि उत्तर पूर्व मतदारसंघातील दौलत खान हे दोन उमेदवार अपवाद असून त्यांना नोटापेक्षा जास्त मते मिळाली आहेत.

नोटाला मिळालेली मते :

मतदारसंघ – २०१४ - २०१९ – २०२४

उत्तर मुंबई – ८७५८ – ११९६६ – १२६४२

उत्तर पश्चिम मुंबई – ११००५- १८२२५- १३७८७

उत्तर पूर्व मुंबई – ७११४- १२४६६- ९८३९

उत्तर मध्य मुंबई- ६९३७- १०६६९ – ९२८१

दक्षिण मध्य मुंबई ९५७१- १३८३४- १३४२३

दक्षिण मुंबई -९५७३- १५११५- १३२२१

# वृक्ष तोडाल तर माणसं कोसळतील : प्रविण बागडे

नागपूर - दरवर्षी जगभर ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे. सृष्टी हे सजीव व निर्जिव वस्तुचे मिश्रण आहे, झाडे ही जीवन आहे. सृष्टीकर्त्याने जीवनाचे मिश्रण अशा प्रकारे केले आहे की, ते सृष्टीच्या जीवनचक्राला संतुलीत ठेवते. कोणत्याही सजीव निर्जीव रचनेसोबत मनुष्याने केलेल्या छेडछाडीचे परिणाम संपूर्ण जीवन सृष्टीला भोगावे लागतात. वृक्षवल्ली हा या सृष्टीचा खरा आधार आहे. तेव्हाच राज्य हिरवेगार होईल आणि आपण प्रदुषण विरहित वातावरणात स्वच्छंद श्वास घेवू यासाठी सर्वांनी कटीबध्द राहावे, कारण तो जीवकी प्राण आहे "झाडे लावा आणि जगवा व अमूल्य असे जीवन वाचवा".



जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर-सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी यादिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो.

आजच्या दिवशी म्हणजेच ५ जून रोजी जगभर पर्यावरण दिवस अगदी थाटामाटाने साजरा केला जातो. त्यादिवशी पुढील जीवनातील परिस्तिथी किती बिकट होईल ते पाहता त्यासाठी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी उपक्रम करून भाषणे करून, झाडे लावा उपक्रम राबवून पुढील धोका टाळण्याचे आज कार्य केले जाते. यासर्वांतूनच या दिवसाची जागरूकता निर्माण होते. आपल्या मातेसमान पृथ्वी आहे आणि तिच्या पर्यावरणाची काळजी सर्वांनी घ्यावी. जवळपास पाच दशकांपासून जागतिक पर्यावरण दिन जागरूकता वाढवत आहे, कृतीला समर्थन देत आहे आणि पर्यावरणासाठी बदल घडवून आणत आहे. जागतिक पर्यावरण दिनाची थीम "ग्रीन सिटीज" होती आणि घोषणा होती "प्लॅन्ट फॉर द प्लॅनेट!" २००५ ला साध्य केली. विषय वाळवंट आणि वाळवंटीकरण होता आणि "वाळवंटात कोरडवाहू नको" असे घोषवाक्य होते.२०११ च्या जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन भारताने केले होते. दिवसाचे यजमानपद भूषवण्याची भारताची ही पहिली वेळ होती. २०११ ची थीम 'फॉरेस्ट्स - नेचर ॲट युवर सर्व्हिस' होती. समुद्र किनारा स्वच्छता, मैफिली, प्रदर्शने, चित्रपट महोत्सव, सामुदायिक कार्यक्रम, वृक्षारोपण आणि बरेच काही यासह जगभरात हजारो उपक्रम आयोजित केले गेले. भारतात नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यासाठी आणि पर्यावरणासाठी जनजागृती करण्यासाठी कदंबचे रोपटे लावले. भारत येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम २०१८ ची थीम "बीट प्लास्टिक पोल्युशन" होती. यजमान राष्ट्र भारत होता. ही थीम निवडून, प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा भार कमी करण्यासाठी लोक त्यांचे दैनंदिन जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे. लोक एकल-वापर किंवा डिस्पोजेबलवर जास्त अवलंबून राहण्यापासून मुक्त असले पाहिजे कारण त्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम आहेत. आपण आपली नैसर्गिक ठिकाणे, आपले वन्यजीव आणि आपले स्वतःचे आरोग्य प्लास्टिकपासून मुक्त केले पाहिजे. भारत सरकारने 2022 पर्यंत भारतातील सर्व प्लास्टिकचा एकच वापर दूर करण्याचे वचन दिले आहे. औद्योगीकीकरण आणि शहरीकरणांच्या प्रक्रियेत प्रदुषणाची समस्या देखील अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. पर्यावरणाला या हानी पासुन वाचविण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. त्यादृष्टिने "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।" ही सर्वश्रेष्ठ तुकाराम महाराजांची शिकवण आचरणात आणुन अख्या महाराष्ट्रात व्यापक प्रमाणात वृक्षरोपणाचा उपक्रम हाती घेतला पाहिजे. एकीकडे वृक्षरोपणाचा गाजावाजा करीत झाडे लावली जातात परंतू नंतर त्याची निगा राखली जात नाही. मृतपाय अवस्थेत ती झाडे असतात ही शोकांतीका आहे. तेव्हा राज्यात मोठया शहरातील महानगर पालीका, नगर पालीका, ग्राम पंचायती, नगर परिषदा यांना वृक्षरोपणाचा उपक्रम राबविण्यासाठी सक्ती केली पाहिजे. कारण राज्याच्या प्रमुख शहरातील वृक्ष तोड सारखी वाढते आहे. त्यामुळे शहरातील सौंदर्यीकरण व सुशोभीकरण असलेले शहरे वृक्ष नसल्यामुळे पार शहरे बकाल होत चाललेली आहेत. त्यामुळे पर्यावरणात सारखी वाढ होत आहे. जिकडे-तिकडे प्रदुषण पाय पसरवित असल्यामुळे आरोग्य असुरक्षीत आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगीकीकरणामुळे निर्माण होणारा नैसर्गीक असमतोल दुर करण्यासाठी तसेच स्वच्छ व हरीत पर्यावरणाच्या निर्मीतीसाठी प्रकल्पाची संकल्पना शासनाने साकारली पाहिजे. जमीन मोकळी करण्यासाठी राजकिय आंधळेपणाचा आणि हव्यासातून आलेल्या आततायीपणाचा शासनामार्फत बुलडोजर सैरावैरा वृक्ष छाटीत निघाला आहे. पण पर्याय शोधला नाही उलट सिमेंट रस्त्याची भर त्यामुळे वातावरण दुषित होणं स्वाभाविक आहे. घरं रचली जातील, अहो पण वृक्ष नसतील तर माणसं कोसळतील त्याचं काय ? या जाणीवेनं वृक्ष वाचवा यासाठी संघर्ष समिति तयार करण्याची गरज आहे. 'झाडे लावा आणि झाडे जगवा'. नुसतं झाडं लावून भागणार नाही तर त्याची निगा राखली पाहिजे, जपवणुक केली पाहिजे. तेव्हा कुठे पर्यावरणाला बाधा होणार नाही तर सृष्टी नटलेली दिसेल बहर आलेला असेल अशावेळी झाडाची काळजी घेतली नाही तर वसुंधरेचं वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही. तेव्हा 'झाडे लावा आणि झाडे जगवा' हा मंत्र प्रत्येक नागरिकानं आत्मसात करुन येणाऱ्या पावसाळयात एक तरी झाड लावून आपलं कर्तव्यपणाला लावावे, जेणेकरुन पर्यावरण दिन साजरा करण्याचं सार्थक होईल.

# जागतिक पर्यावरण दिन

आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात ( युनो ) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program ( UNEP ) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस



जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर होस्ट करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते . गतवर्षी म्हणजे २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही गतवर्षीची थीम होती. यावर्षी म्हणजे २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही यावर्षीची थीम आहे. या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली जाणार आहे. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@ gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# संगीत कार्यक्रमातून जिवन संवर्धन फाउंडेशनला मदत

## एमएच संगीत ग्रुपने जपली सामाजिक बांधिलकी




● कल्याण : आपल्या सामाजिक कार्य घडावे या हेतूने ग्रुपने सामाजिक बांधिलकी दिवंगत मित्राच्या इच्छेनुसार कल्याणमधील एमएच संगीत जपत एका संगीत कार्यक्रमाच्या माध्यमातून रस्त्यावरील अनाथ, भिखारी, वेश्या व्यवसाय करणाऱ्या, बेवारस मुला - मुलींना हक्काचे घर देणाऱ्या टिटवाळा येथील जिवन संवर्धन फाऊंडेशनला आर्थिक मदत केली आहे.

काही संगीत प्रेमिनी मिळून ५ वर्षांपूर्वी एक सुरेल ग्रुप बनवला त्यांचे नामकरण MH SANGEET GROUP असे ठेवले. विविध उपक्रमातून संगीत कार्यक्रम घेऊ लागले. या ग्रुपमधील एक सदस्य विनोद शर्मा यांचे निधन झाले. मात्र त्यांनी जाता जाता ग्रुपला सामाजिक कार्य करण्याची एक संधी देऊन गेले. शर्मा यांचे एक स्वप्न होते की, एक भव दिव्य म्युझिकल शो आचार्य प्रल्हाद केशव अत्रे सभागृह, कल्याण येथे करून जे काही निधी तिकीट विक्रीतून शिल्लक राहील तो जीवन संवर्धन संस्थेला मदत करू.

त्यांचा हा वसा त्यांच्या सर्व मित्रांनी म्हणजेच नितीन काळे, दिलीप सोनार, प्रमोद मोरे, प्रशांत भावसार, सागर गायकवाड, प्रशांत तोशनिवाल व अमर घोलप यांनी दिवस रात्र एक करीत विनोद शर्मा यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून एक प्यार का नगमा... हा मधुर संगीत गीतांचा कार्यक्रम विशाल ढाकणे यांच्या १० वाद्यवृंदासोबत सोबत तब्बल सुमधुर २४ गाणी सादर केली. प्रेक्षकगृह बऱ्याच वर्षांनी हाऊस फुल झाला होता. यावेळी खासदार कपिल पाटील, माजी आमदार नरेंद्र पवार, माजी नगरसेवक सुनिल वायले व महावितरणचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांचे स्वागत व सर्व कार्यक्रमाचे सखोल नियोजन स्मिता काळे, विजया सोनार, प्रांजली मोरे, निशा गायकवाड, गीता भावसार, सोनल तोषनिवाल, पूजा घोलप या महिला मंडळानी सुखरूपणे पार पडला. एमएच संगीत ग्रुप कल्याण यांनी या चॅरिटी शो मधून तब्बल १ लाख ९३ हजार ८५० रुपयांचा निधी धनादेश रूपाने जिवन संवर्धन संस्थेचे संस्थापक सदाशिव चव्हाण यांना देणगी रूपाने दिला. या ग्रुपणे सर्व समाजापुढे एक अनोखा आदर्श निर्माण केला असून इतरांनी देखील अशाच प्रकारे सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा यामुळे मिळाली असल्याची प्रतिक्रिया यावेळी उपस्थितांनी दिली.

# पनवेल महापालिकेचे समाजमाध्यमाद्वारे नियुक्तीचे खोटे पत्र



● पनवेल: पनवेल महापालिकेमध्ये नूकतेच ३७७ पदांकरीता भरती प्रक्रीया पार पडली. मात्र सरकारी नोकरीचे आमिष दाखवून उमेदवारांची फसवणूक करण्याचे प्रमाण सूरुच आहेत. महापालिकेचे नाव वापरुन एकाने पर्यवेक्षक संगणक ऑपरेटर या पदासाठी अभिनव उत्तम शिंदे या उमेदवारांना खोटे प्रस्ताव पत्र (ऑफर लेटर) दिल्याने एकच खळबळ माजली. ३१ मे रोजी हे पत्र समाजमाध्यमांवर पसरल्यानंतर पनवेल महापालिकेने या पत्राची दखल घेत संबंधित अनोळखी व्यक्ती विरोधात पनवेल शहर पोलीसांना या प्रकरणी लक्ष घालून फौजदारी कारवाई करण्याची शिफारस केली आहे. संबंधित अनोळखी व्यक्तीने नोकरीची गरज असणा-या अनेक गरजूंची खोट्या पत्राव्दारे पैसे उकळले असून त्यांची फसवणूक केल्याचा संशय पालिकेने पोलीसांना दिलेल्या पत्रात व्यक्त केला आहे.

महापालिकेने मागील वर्षी ४१ संवर्गातील ३७७ पदांकरीता ऑनलाईन परिक्षा घेतल्यानंतर एकही गैरव्यवहार झाला नसल्याची आणि पारदर्शकतेने भरती प्रक्रिया झाल्याचा दावा केला होता. या परिक्षेत प्राप्त गुणानुक्रम, प्रवर्गनिहाय, सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन निवड सुची प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर परिक्षातील उत्तीर्ण व निवड झालेल्या उमेदवारांना १५ मार्चला नियुक्ती आदेश दिले होते.

# कल्याण डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा गुरूवारी दहा तास बंद



● कल्याण – कल्याण, डोंबिवली शहरांना कल्याण डोंबिवली पालिकेकडून पाणी पुरवठा करणाऱ्या नेतिवली, बारावे येथील जलशुध्दीकरण केंद्रात देखभाल दुरुस्तीची कामे करायची असल्याने कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा गुरुवारी (ता.६ जून) रोजी सकाळी आठ ते संध्याकाळी सहा या वेळेत बंद राहणार आहे, अशी माहिती पाणी पुरवठा विभागाचे यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी दिली आहे.

जलशुध्दीकरण केंद्रांच्या या दुरुस्ती, देखभालीच्या कामांमुळे कल्याण पूर्व, पश्चिम, डोंबिवली पूर्व आणि पश्चिम आणि परिसराचा पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. पावसाळ्याच्या तोंडावर दरवर्षी या जलशुध्दीकरण केंद्रांच्या दुरुस्तीची कामे केली जातात. त्याप्रमाणे ही कामे हाती घेतली जाणार आहेत. या जलशुध्दीकरण केंद्रातून होणाऱ्या मुख्य जलवाहिनी, पोहच जलवाहिनींवरील पाणी गळती थांबविण्याची कामे या कालावधीत केली जाणार आहेत, असे कार्यकारी अभियंता घोडे यांनी सांगितले. या कालावधीत यांत्रिकी आणि तांत्रिक दुरुस्तीचीही कामे केली जाणार आहेत. गुरुवारी दिवसभर दहा तास कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी या दोन्ही शहरांना कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी एक दिवस पुरेल इतका पाणी साठा घरात करून ठेवावा, असे आवाहन पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने केले आहे.

# “बच्चा बडा हो गया”! सुप्रिया सुळेंच्या विजयी आघाडीवर रोहित पवारांचे ट्विट

● बारामती - बारामती लोकसभा मतदारसंघाची देशात चर्चा झाली होती. या मतदारसंघात खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी निवडणूक लढवली. आज लोकसभेची मतमोजणी सुरू आहे. बारामतीची लोढत चुरशीने झाली होती. दरम्यान, आता खासदार सुप्रिया सुळे आघाडीवर आहेत. सुळे या विजयाच्या जवळ पोहोचल्या आहे. दरम्यान, आता आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे.

रोहित पवारांची सोशल मीडिया पोस्ट काय?

“बच्चा बडा हो गया! काही नेत्यांना वाटतं की नवीन पिढीला नेता बनण्याची घाई झालीय; पण त्यांना सांगायचंय की, नेता बनण्याची घाई नाही तर सध्या ज्या खालच्या पातळीला राजकारण गेलं त्याचा स्तर सुधारण्याची मात्र नक्कीच घाई झालीय, असा टोलाही राहित पवार यांनी लगावला आहे.

“बारामतीत सुप्रियाताईंचा #विजय हा आदरणीय पवार साहेबांच्या विचारांचा, सुप्रियाताईंच्या कष्टाचा, #मविआचे सर्व



पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ते यांच्या त्यागाचा आणि दडपशाहीला झुगारलेल्या स्वाभिमानी सामान्य जनतेच्या प्रेमाचा आहे. या दणदणीत विजयाबद्दल सुप्रियाताईंचं मनापासून अभिनंदन, असंही रोहित पवार म्हणाले.

सुनेत्रा पवार १ लाखांच्या फरकाने पराभूत

मतमोजणीला सुरवातीपासून सुप्रिया सुळे आघाडीवर होत्या. अखेर सुप्रिया सुळे एक लाखांच्या फरकाने निवडून आल्या आहेत. अजितदादांनी सुरुवातीपासून बारामतीमध्ये खूप प्रचार केला होता. भावनिक होऊन जाऊ नका , कोणाचं ऐकू नका, माझंच ऐका अशी वक्तव्ये केली होती. बारामतीकर त्यांना साथ देतील असा विश्वासही अजित पवाराना होता. परंतु आता आलेल्या निकालावरून सगळं उलटच चित्र झाल्याचे दिसून आले आहे. अजित पवारांची बंडखोरी त्यांना महागात पडल्याचे या बारामती लोकसभेच्या निकालावरून दिसून आले आहे. बारामतीत सर्वत्र जल्लोषचे वातावरण आहे. कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याकडून गुलालाची उधळण करत, साहेबांचाय नावाने घोषणाबाजी करत जल्लोष साजरा केला जात आहे. ०बारामतीवर थोरले की धाकटे पवार वर्चस्व राखणार याकडे दिल्लीपासून गल्लीचे लक्ष लागले होते. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याबरोबर उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे यांचे देखील राजकारणात स्वत:चे वेगळे स्थान आहे. वेळोवेळी मिळालेल्या राजकीय यशाचे हे स्थान नेहमीच अधोरेखित झाले आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्यासह ‘साहेब’ आणि ‘दादां’च्या राजकारणाचेच एका अर्थाने आज भवितव्य ठरणार होते. मतदारसंघात यंदा ६९.४८ टक्के मतदान झाले. हेच मतदान २०१९ मध्ये ७०.२४ टक्के झाले होते. त्यामुळे यंदा बारामतीच्या मतदानात ०.७६ टक्के घट झाली. भावनिकतेचा मुद्दा आणि विकासकामांच्या मुद्यासह पवार कुटुंबीयांनी एकमेकांवर केलेले आरोप यंदाच्या लोकसभेत चर्चेचा विषय ठरले.

# पर्यावरण दक्षता मंडळाच्या वतीने फुलपाखरु उद्यान बनविण्यासाठी रोपांचे वितरण

● कल्याण : पर्यावरण दक्षता मंडळ ही स्वयंसेवी संस्था गेली २५ वर्ष विविध उपक्रमातून पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीचे काम करत आहे. ५ जून रोजी असणाऱ्या ‘पर्यावरण दिनानिमित्त’ फुलपाखरु उद्यान बनविण्यासाठी रोपांच्या वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पर्यावरण दक्षता मंडळ, एन्व्हायरो व्हिजिल आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यातील २५ गृहसंकुलांना (हाऊसिंग सोसायटी) त्यांच्या सोसायटीच्या आवारात ‘फूलपाखरू उद्यान’ तयार करण्यासाठी ५० रोपांचा समुह असलेले एक किट देण्यात येणार आहे. ही सर्व रोपे पर्यावरण दक्षता मंडळाच्या मामणोली येथील ‘निसर्गायण’ प्रकल्पामध्ये तयार करण्यात आली आहेत. या किटमध्ये ‘होस्ट प्लॅन्ट’ आणि ‘नेक्टर प्लॅन्ट’ या दोन्ही प्रकारच्या रोपांचा समावेश असणार आहे.

कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ठाणे विभागाचे अधिकारी शकिल शेख, पर्यावरण आणि फूलपाखरू अभ्यासक दिवाकर ठोंबरे, राजू कसंबे व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते सोसायटीच्या सभासदांना रोपांचे वितरण करण्यात येईल. या वर्षीच्या पर्यावरण दिनाच्या संकल्पनेविषयी पर्यावरण दक्षता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संजय जोशी उपस्थितांना मार्गदर्शन करतील. तसेच ‘आपलं पर्यावरण’ मासिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होईल.

हा कार्यक्रम बुधवारी ठाणे पूर्व येथील भारतीय स्त्री जीवन विकास परिषद, अष्टविनायक चौक येथे संध्याकाळी ५:३० ते ७:३० येथे पार पडणार आहे. सर्व पर्यावरणप्रेमींना या कार्यक्रमात सहभागी होऊन पर्यावरण दिन साजरा करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

# टिटवाळा येथे घोडेस्वारी प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न

● कल्याण : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे आणि विनायक मार्शल आर्टस् आणि फिटनेस झोन टिटवाळा यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने 2 दिवसीय घोडेस्वारी खेळाचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. टिटवाळा येथील सेंट थॉमस स्कूल, रुंदे येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात 10 वर्ष वयोगटावरील 25 युवक आणि युवतींनी सहभाग नोंदविला होता.

या हॉर्स रायडिंग प्रशिक्षण शिबिराचे आयोजक राज्य युवा पुरस्कार विजेते विनायक कोळी आणि क्रीडा प्रशिक्षक हरीष वायदंडे यांच्या नेतृत्वाखाली हे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले असून घोडेस्वारी खेळाची माहिती,



खेळासाठी उपयोगात येणारे घोडे, त्यांचा आहार, घोडेस्वारी खेळातील संरक्षणात्मक बाबी, घोडा चालवणे, घोड्यावर ताबा मिळवणे, घोड्यावर चढणे आणि उतरणे अशा अनेक गोष्टींचा समावेश या शिबिरात करण्यात आला होता. घोडेस्वारी खेळाचे उत्कृष्ट खेळाडू आणि प्रशिक्षक किशोर मोहिते यांनी सर्व सहभागी युवक आणि युवतींना मोलाचे मार्गदर्शन केले.

केवळ काही तासांतच सहभागी मुले आणि मुली यशस्वीरीत्या घोडा चालविण्यात सिद्ध झाले. ग्रुप ट्रेनिंग, बडी ट्रेनिंग आणि सोलो ट्रेनिंग अशा विवीध प्रकारच्या प्रशिक्षणाच्या युक्त्या वापरून सर्व सहभागी युवक आणि युवतींना प्रशिक्षण देण्यात आले. 2 दिवस प्रशिक्षण घेऊन स्वतः घोडा चालविण्यात यशस्वी झालेल्या सर्व सहभागीना ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र देऊन गौरण्यात आले.

हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी सेंट थॉमस स्कूल चे संचालक डॉ. अशोक साळवे आणि मुख्याध्यापिका साळवे यांनी 2 दिवस शाळेचे क्रीडांगण उपलब्ध करून देऊन मोलाचे सहकार्य केले. सर्व यशस्वी खेळाडूंसाठी लवकरच अडव्हांस हॉर्स रायडिंग शिबिर आयोजित करण्यात येणार आहे.

# ‘मावळ’च्या निकालाचा धसका पनवेल भाजपच्या चाणक्यांना

● पनवेल : मावळ लोकसभेच्या निवडणूकीच्या निकालाने पनवेलमधील भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. चार महिन्यांनी राज्यात विधानसभेच्या निवडणूका लागण्याची शक्यता असल्याने पनवेल विधानसभेतील निवडणूकीत भाजपची मते कमी झाली का असा प्रश्न भाजपच्या कार्यकर्त्यांना पडला आहे. पनवेल विधानसभेच्या येऊ घातलेल्या चार महिन्यांवरील निवडणूकांना आ. प्रशांत ठाकूर हे चौथ्यांदा सामोरे जाणार आहेत. मात्र २०१९ सालच्या विधानसभा निवडणूकीत आ. ठाकूर यांना पावणेदोन लाखांपेक्षा अधिक मते मिळाली. मावळ लोकसभेच्या मंगळवारच्या निकालपत्रात महायुतीचे श्रीरंग बारणे यांना १,५०,९२४ मते मिळाली. ही मते पडण्यासाठी आ. प्रशांत ठाकूर यांनीही विधानसभा निवडणूकीच्या रंगीत तालिमीप्रमाणे रस्त्यावर उतरुन प्रचार केला. विधासभा क्षेत्रातील बुथनिहाय कार्यकर्त्यांच्या बैठका घेणे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य प्रचार सभा खारघर येथे घेण्यात आली. त्यानंतरही महायुतीच्या



उमेदवार बारणे यांना मिळालेली मते कमी असल्याने ही मते कमी होण्याची कारणे काय असा प्रश्न भाजपच्या चाणक्यांना पडला आहे. महायुतीच्या उमेदवार बारणे यांना यावेळी कमी मते मिळाली त्याही पेक्षा या निवडणूकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना १,१९,८८६ मते मिळाली. ही बाब भाजपच्या चाणक्यांना चिंतेत टाकणारी आहे.

२०१९ सालच्या विधानसभेच्या निवडणूकीत शेकापचे उमेदवार हरेश केणी यांना ८६ हजारांहून अधिक मते मिळाली होती. त्यामुळे शेकाप, शिवसेना, काँग्रेस पक्षाच्या महाविकास आघाडीने पनवेल विधानसभा क्षेत्रात चार महिन्यांपूर्वी बाळाराम पाटील यांच्यासारखा दारोदारी प्रचार करणारा भक्कम उमेदवार दिल्यास आ. ठाकूर यांची चौथ्यांदा विजयाची वाट खडतर होण्याची शक्यता मानली जाते. त्याशिवाय २०१९ सालच्या निवडणूकीत १२ हजारांहून अधिक मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला होता. मंगळवारच्या लोकसभेच्या मतमोजणीत पनवेलच्या ४४०१ मतदारांनी नोटाचा पर्याय निवडल्याने विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांची चिंता वाढली आहे. २०१९ साली विधानसभेच्या निवडणूकीत ५४.१३ टक्के तर लोकसभेच्या यावेळच्या निवडणूकीत ५४.८७ टक्के मतदान झाल्याने मंगळवारी लोकसभेच्या निकालानंतर भाजपचे पनवेलमधील अनेक चाणक्य जल्लोष साजरा करण्यापेक्षा कोणत्या बुथवर किती मतदान झाले याची आकडेवारी जुळविण्याचा प्रयत्न करताना दिसत होते.

# आयर्लंडविरुद्धच्या सामन्यासाठी सुनील गावसकरांनी निवडली भारताची प्लेइंग इलेव्हन



टी-२० विश्वचषकात टीम इंडियाच्या मोहिमेला सुरुवात होण्यासाठी फक्त एक दिवस बाकी आहे. ५ जून रोजी न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि आयर्लंड आमनेसामने येतील. या सामन्यात टीम इंडिया कोणत्या प्लेइंग इलेव्हनसह उतरणार याकडे सर्वांचे नजरा लागल्या आहेत. अशा माजी खेळाडू सुनील गावसकर यांनी आपली प्लेइंग इलेव्हन निवडली आहे. या प्लेइंग इलेव्हनमधून गावसकरांनी अर्शदीप सिंगला वगळले आहे, तर अष्टपैलू शिवम दुबेला संघात ठेवले आहे. याशिवाय गावस्कर यांनी रोहित शर्मा, विराट कोहली आणि यशस्वी जैस्वाल यांच्या फलंदाजीची पोझिशनही सांगितली आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ निकाल

रोहित-विराट सलामी देणार –

दिग्गज माजी फलंदाज सुनील गावसकर यांनी विराट कोहली आणि रोहित शर्माला त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये सलामीवीर म्हणून स्थान दिले आहे. याशिवाय यशस्वी जैस्वालला तिसऱ्या क्रमांकावर ठेवण्यात आले आहे. चौथे नाव सूर्यकुमार यादव आणि पाचवे नाव ऋषभ पंत. यष्टिरक्षक फलंदाज म्हणून गावसकर यांनी संजू सॅमसनपेक्षा पंतला प्राधान्य दिले आहे आणि सहाव्या क्रमांकावर हार्दिक पंड्याची निवड केली आहे.

शिवम दुबेसह या गोलंदाजांना दिले स्थान –


'लिटिल मास्टर' सुनील गावसकरांनी हार्दिक पंड्यानंतर रवींद्र जडेजाची सातव्या क्रमांकावर निवड केली आहे. याशिवाय त्यांनी शिवम दुबेला आठव्या स्थानी संधी दिली आहे. शिवम दुबेने बांगलादेशविरुद्धच्या एकमेव सराव सामन्यात गोलंदाजी करताना २ विकेट्स घेतल्या होत्या. मात्र, तो बॅटने काही खास कामगिरी करु शकला नाही. गोलंदाजीत 'लिटिल मास्टर'ने कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांची निवड केली आहे.

सुनील गावसकरांनी जलदगती गोलंदाजांमध्ये अर्शदीप सिंगचा समावेश केलेला नाही. याशिवाय युझवेंद्र चहल आणि संजू सॅमसन यांनाही प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर ठेवण्यात आले आहे. मात्र, रोहित शर्मा आणि राहुल द्रविड कोणत्या प्लेइंग इलेव्हनसह सामन्यात प्रवेश करतात हे पाहणे बाकी आहे. विराट आणि रोहित करणार ओपनिंग, रोहित यशस्वीसोबत ओपनिंग करताना दिसणार का? या सामन्यानंतर भारताचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. हा सामना ९ जून रोजी न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे.

सुनील गावसकरांची प्लेइंग इलेव्हन :

रोहित शर्मा, विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, सूर्यकुमार यादव, ऋषभ पंत, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, शिवम दुबे, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज.

## बाबा झाल्यावर वरुण धवनने केली पहिली पोस्ट




अभिनेता वरुण धवन आणि नताशा दलाल यांच्या आयुष्यात सोमवारी (३ जून रोजी) एका गोंडस मुलीचं आगमन झालं. नुकताच बाबा झालेल्या वरुण धवनने आता त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर करत ही गुड न्यूज चाहत्यांना दिली आहे.

वरुणने इन्स्टाग्रामवर एक ग्राफिक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओला कॅप्शन देत त्याने लिहिलं, "आम्हाला मुलगी झाली आहे. आई आणि बाळासाठी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्याबद्दल धन्यवाद. हरे राम हरे राम, राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।"

वरुणने दिलेल्या गुडन्यूजसाठी अनेक कलाकारांनी कमेंट्स करत शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. करीना कपूरने कमेंट करत लिहिलं, "देव तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो. खूप अप्रतिम बातमी दिलीस." तर अभिषेक बच्चनने कमेंट करत लिहिलं, "किती छान बातमी आहे. अभिनंदन"

"अभिनंदन.. तुम्हा तिघांसाठी खूप खूप प्रेम" अशी कमेंट रकुल प्रीतने केली. तर समंथा रुथ प्रभू, अरमान मलिक, प्रियांका चोप्रा, परिणीती चोप्रा, सान्या मल्होत्रा, शर्वरी, बिपाशा बासू अशा अनेक कलाकारांनी वरुण आणि त्याच्या कुटुंबीयांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## T20 World Cup 2024 साठी चकित करणारी बक्षीसाची रक्कम जाहीर



T20 World Cup 2024 Prize Money Announced: आयसीसी टी-२० विश्वचषकाला २ जूनपासून सुरुवात झाली आहे. अमेरिका आणि वेस्ट इंडिज यांच्या यजमानपदाखाली होत असलेल्या या स्पर्धेत एकूण २० संघ खेळत आहेत. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच इतके संघ एकत्र सहभागी होत आहेत. या संघांची प्रत्येकी पाच गटात विभागणी करण्यात आली आहे. दरम्यान, आयसीसीने या स्पर्धेसाठी बक्षीस रक्कमही जाहीर केली आहे. यावेळी टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावणाऱ्या संघाला ऐतिहासिक बक्षीस रक्कम मिळणार आहे. यापूर्वी इतकी मोठी रक्कम कोणत्याही संघाला मिळाली नाही.

T20 Word Cup 2024 साठी किती आहे बक्षीसाची रक्कम

२०२४ च्या टी-२० विश्वचषकासाठी ICC ने एकूण ११.२५ दशलक्ष डॉलर बक्षीस रक्कम म्हणून देणारं आहे. ICC ने २०२२ च्या टी-२० विश्वचषकासाठी एकूण बक्षीस रक्कम ५.६ दशलक्ष डॉलर्स ठेवली होती. पण यावेळी आयसीसीने त्यात दुप्पट वाढ केली आहे. यावेळी विजेत्या संघाला २.४५ दशलक्ष डॉलर्स (USD) दिले जातील. जे भारतीय रुपयाप्रमाणे सुमारे २० कोटी रुपये आहेत. तर उपविजेत्या संघाला एकूण १. २८ दक्षलक्ष डॉलर्स म्हणजेच भारतीय रुपयाप्रमाणे१०.५० कोटी इतकी आहे. २०२२ मध्ये जेतेपद पटकवलेल्या इंग्लंड संघाला १३ कोटी बक्षीसाची रक्कम मिळाली होती. तर ६.४४ कोटी रुपये उपविजेत्या पाकिस्तान संघाला देण्यात आले होते.

उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या संघांनाही यावेळी बक्षिसाची मोठी रक्कम मिळणार आहे. उपांत्य फेरीत पराभूत होणाऱ्या संघांना ६.५५ कोटी रुपये दिले जातील.

## निकालाच्या दिवशी कंगणाला आईने भरवली दही साखर




आज देशाच्या राजकारणातील सर्वात मोठा दिवस आहे. ४३ दिवसा चाललेल्या १८ व्या लोकसभा निवडणूक निकालाकडे देशाचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे यंदाच्या लोकसभेच्या निवडणूकीमध्ये अनेक दिग्गज लोक रिंगणात उतरले आहे. बॉलीवूड अभिनेत्री कंगणा रणौत भाजपकडून हिमाचल प्रदेशातील मंडी लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवली आहे. त्यामुळे मंडी लोकसभा मतदार संघात काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ निकाल

कंगणा रणौतने एक्सवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने तिच्या आईबरोबरच्या काही फोटो शेअर केल्या आहेत. या फोटोंमध्ये कंगणाची आई तिला दही साखर भरवताना दिसत आहे. पोस्टच्या कॅप्शनमध्ये कंगणाने लिहिलेय, "आई देवाचे रूप आहे. आज माझ्या आईने मला दही साखर खाऊ घातली"

पाहा फोटो

"मी कुठेही जाणार नाही."

हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदारसंघात भाजप विरूद्ध काँग्रेस अशी चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. एकीकडे भाजपाने बॉलीवूडची क्वीन सुप्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणौतला निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे तर तर दुसरीकडे काँग्रेसने या मतदारसंघातून राजघराण्यातील वंशज विक्रमादित्य सिंह यांना स्पर्धेत उतरवले आहे. कंगणा रणौत आणि विक्रमादित्य सिंह दोघेही एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. विक्रमादित्य सिंह यांनी कंगनावर केल्यावर टिकेवर एएनआयशी बोलताना तिने आज यावर उत्तर दिले आहे.

कंगणा म्हणाली, "त्यांना अशा प्रकारे बोलण्याचा परिणाम भोगावा लागेल. कोणत्याही महिलेविषयी असे बोलणे किती चुकीचे आहे, हे यावरून स्पष्ट होत आहे कारण मंडीमधून भाजप आघाडीवर आहे. माझी ही जन्मभूमी आहे. मोदींचे स्वप्न 'सबका साथ सबका विकास'मध्ये त्यांची सेना बनून काम करणार. मी कुठेही जाणार नाही. होऊ शकते इतर लोकांना त्यांच्या बॅग भरून जावे लागू शकते पण मी कुठेही जाणार नाही."

भाजपाने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला आहे. याआधी भाजपाने २०१४ आणि २०१९ या निवडणुकीत भाजपाने बहुमत मिळवलं होतं. यावेळी भाजपाने स्वतः ३७० जागा जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. आता आपण जाणून घेऊ भाजपाने २०१४ मध्ये किती जागा लढवल्या आणि २०१९ मध्ये किती जागा लढवल्या? २०१४ मध्ये भाजपाने ४२८ जागांवर निवडणूक लढवली होती. त्यापैकी २८२ जागा भाजपाने जिंकल्या होत्या. तर २०१९ ला भाजपाने ४३६ जागांवर निवडणूक लढवली आणि ३०३ जागा मिळवल्या होत्या.

भाजपाने २०१४ आणि २०१९ या दोन्ही वर्षांमध्ये बहुमताच्या संख्येपक्षा जास्त जागा मिळवल्या. आता या खेपेला म्हणजेच २०२४ मध्ये भाजपाने ४४१ जागा लढवल्या आहेत. तर १०२ जागा मित्र पक्षांना दिल्या आहेत. आता या यावेळी ४४१ पैकी ३७० जागा भाजपा जिंकतंय का हे आज स्पष्ट होणार आहे. २०१९ मध्ये भाजपाला जी मतं मिळाली त्याची सरासरी २०१४ च्या तुलनेत अधिक होती. २०१९ मध्ये भाजपाच्या विजयाचा स्ट्राईक रेट हा ६९ टक्क्यांवर पोहचला होता. आता या वेळी काय निकाल लागतो? एकट्या भाजपाला किती जागा मिळतात हे पाहणं औत्सुक्याचं असणार आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०२२ : राफेल नदाल - यांनी १४वे फ्रेंच ओपन आणि कारकिर्दीतील विक्रमी २२वे ग्रँडस्लॅम विजेतेपद जिंकले

२०२२: चार धाम यात्रेला जात असलेली बस उत्तरकाशीमध्ये दरीत कोसळल्याने १५ लोकांचे निधन तर ६ जखमी.

२०१५: मलेशिया देशात झालेल्या ६.० रेक्टर तीव्रतेच्या भूकंपाने रानौ, सबा, मलेशियात मोठ्या प्रमाणात भूस्खलनानंतर माउंट किनाबालूवर हायकर्स आणि माउंटन गाइड्ससह १८ लोकांचे निधन.

२००४: फ्रान्समध्ये प्रथमच दोन पुरुषांचा समलिंगी विवाह साजरा झाला.

२००३: पाकिस्तान आणि भारतामध्ये तीव्र उष्णतेची लाट आल्यामुळे तापमान ५० डिग्री सेल्सिअस पेक्षा जास्त झाले..

१९९७ : काँगो - देशात दुसरे प्रजासत्ताक राष्ट्रीय युद्ध सुरू झाले.

१९९५ : बोस-आईनस्टाईन कंडेन्सेट पहिल्यांदा तयार केले गेले.

**जन्म**

१९७२: योगी आदित्यनाथ भारतीय पुजारी, उत्तर प्रदेशचे २१वे मुख्यमंत्री

१९६१ : रमेश कृष्णन भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक पद्मश्री

१९६१ : बिष्णू सेठी - भारतीय लेखक आणि राजकारणी, ओडिशाचे आमदार (निधन: १९ सप्टेंबर २०२२)

१९४६ : पॅट्रिक हेड विल्यम्स एफ१ टीमचे सहसंस्थापक

१९०८: रवि नारायण रेड्डी - कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सहसंस्थापक (निधन: ७ सप्टेंबर १९९१)

१८८३ : जॉन मायनार्ड केन्स ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ (निधन: २१ एप्रिल १९४६)

१८८१ : गोविंदराव टेंबे - भारतीय संगीतकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक ( निधन: ९ ऑक्टोबर १९५५)

**निधन**

२००४ : रोनाल्ड रेगन अभिनेते आणि अमेरिकेचे ४० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ६ फेब्रुवारी १९११)

१९९९ : सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले राजमाता श्रीमंत छत्रपती

१९९६: कुबेर नाथ राय - भारतीय कवि आणि विद्वान आचार्य (जन्म: २६ मार्च १९३३)

१९७३ : श्री गुरूजी - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे २रे सरसंघचालक (जन्म: १९ फेब्रुवारी १९०६)

१९५० : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: १४ सप्टेंबर २०११)

## किडनी स्टोन होऊ नये म्हणून चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ



मुतखडा म्हणजेच किडनी स्टोन होणं ही एक सामान्य समस्या बनत चालली आहे. शरीरातील खनिजे आणि क्षार जेव्हा स्टोनचे रूप धारण करतात, तेव्हा त्याला आपण मुतखडा झाला म्हणतो. जेव्हा अतिरिक्त क्षार एखाद्या व्यक्तीच्या शरीरातून लघवीद्वारे काढून टाकता येत नाहीत आणि मूत्रपिंडात जमा होतात, तेव्हा दगड तयार होतात. खाण्या-पिण्यातील अनियमितता आणि आवश्यक तेवढं पाणी न पिणे हे मुतखडा होण्याचे मुख्य कारण आहे. मुतखडा अनेकांना होतो, पण काहींच्या किडनीमध्ये तयार झालेला स्टोन सहज बाहेर पडतो. मात्र, काहींचा स्टोन मोठा असल्याने तो बाहेर पडण्यास अडचणी येतात; त्यामुळे काही लोकांना फार जास्त त्रास सहन करावा लागतो.

लोकसभा निवडणूक २०२४ निकाल

शरीरामध्ये जेव्हा किडनी स्टोन हळूहळू तयार होऊ लागतो, तेव्हा मूत्राशयातील मार्गामध्ये अडथळा निर्माण होतो आणि परिणामी व्यक्तीला लघवी करण्यास जळजळ, आग होणे, प्रचंड प्रमाणात वेदना होणे, अशा अनेक समस्या व लक्षणे जाणवत असतात. मुतखडा हा अतिव यातना देणारा रोग आहे. मुतखड्याचा असह्य त्रास थांबण्यासाठी काही वेळा शस्त्रक्रिया करावी लागते. मात्र, पुन्हा-पुन्हा मुतखडा होऊ नये यासाठी औषधे अधिक गुणकारी असतात. खरंतर आपल्या आहारात अशा काही गोष्टी असतात, ज्या पोटात जमा होऊन पुढे स्टोन बनतात. अशात किडनी स्टोनपासून कसा बचाव करावा आणि किडनी स्टोनपासून दूर राहण्यासाठी कोणते पदार्थ खाणे टाळले पाहिजे, याविषयावर हैदराबाद येथील बंजारा हिल्स केअर हॉस्पिटल्सचे सल्लागार यूरोलॉजिस्ट डॉ. पी. वामशी कृष्णा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ...

डॉ. कृष्णा म्हणतात, "बदलत्या जीवनशैलीमुळे आणि अयोग्य आहारामुळे आजकाल अनेक लोक अनेक समस्यांना बळी पडत चालले आहेत. मुतखडा ही अशीच एक समस्या आहे. मुतखड्याचा त्रास हा आजकाल वृद्धांबरोबरच लहान मुलांनाही होऊ लागला आहे. मुतखड्याचा थेट परिणाम आपल्या मूत्रमार्गावर होतो. पुरेसे पाणी प्यायल्याने आपले शरीर हायड्रेट तर राहतेच, पण त्यामुळे मुतखड्याचा धोकाही कमी होतो. खरं सांगायचं तर शरीरात पाण्याची कमतरता असेल तर त्यामुळेही अनेकदा मुतखड्याचा त्रास होऊ शकतो." किडनी स्टोन होऊ नये म्हणून कोणत्या पदार्थांचा आहारात समावेश करू नये, हे जाणून घेऊया..

## राशि भविष्य

**मेष** – गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. ज्या लोकांची अजून सॅलरी आलेली नाही आज ते पैश्याला घेऊन खूप चिंतीत राहू शकतात आणि आपल्या मित्राकडून उधार मागू शकतात. आपल्या प्रिय व्यक्तीशी भेटवस्तूंची देवघेव करण्यास अतिशय शुभ दिवस आहे.

**वृषभ** – आज तुम्ही करमणुकीत रमाल. क्रीडा प्रकार आणि मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल. आज तुम्हाला आपले धन खर्च करण्याची गरज पडणार नाही कारण, घरातील कुणी मोठे व्यक्ती तुम्हाला धन धन देऊ शकतात. प्रभावी ठरणाऱ्या आणि महत्त्वाच्या पदांवरील लोकांशी संपर्क साधता यावा आणि संबंध वाढवावेत यासाठी तुम्हाला वेगवेगळ्या कार्यक्रमांना हजेरी लावणे ही चांगली संधी ठरेल.

**मिथुन** – तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. पारंपरिक पद्धतीची गुंतवणूक कराल तर तुम्हाला त्यातून चांगली धनप्राप्ती होईल. मुलं तुम्ही लक्ष देण्याची अपेक्षा करतील, अर्थात त्यातून तुम्हाला आनंदच मिळेल.

**कर्क** – इतरांशी आनंदाचे क्षण वाटल्यामुळे तुमची प्रकृती ताजीतवानी होईल. परंतु, तुम्ही प्रकृतीकडे दुर्लक्ष केलेत तर मात्र तुम्ही परत आजारी पडाल. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ. प्रेमाची ताकदच तुमच्यासाठी प्रेम करण्याचे कारण ठरेल.

**सिंह** – देणगी आणि धर्मादाय कामामध्ये स्वत:ला गुंतवा, त्यातून तुम्हाला मन:शांती लाभेल. आज तुमच्या आई-वडिलांपैकी कुणी धन बचत करण्यासाठी लेक्चर देऊ शकतात तुम्हाला त्यांच्या गोष्टी व्यवस्थित ऐकण्याची आवश्यकता आहे अथवा येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**कन्या** – तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. जर तुम्ही लोन घेणार असाल आणि बऱ्याच दिवस याच कामात असाल तर, आजच्या दिवशी तुम्हाला लोन मिळू शकते. तुम्ही कार्यालयात अतिरिक्त वेळ खर्च केलात तर तुमच्या घरगुती जीवनावर परिणाम होईल. एखाद्या आनंदी प्रसन्न सहलीला जाण्याची शक्यता आहे.

**तूळ** – जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच. तुम्ही प्रवास करणे आणि पैसे खर्च करण्याच्या मूडमध्ये असाल - परंतु नंतर त्याचे तुम्हाला दुःख होईल. तुम्ही जर अधिक उदारपणे वागत असाल तर तुमच्या जवळच्या व्यक्ती तुमचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** – दंतदुखी किंवा पोट बिघडण्यामुळे काही समस्या निर्माण होईल. ताबडतोब आराम पडावा यासाठी वैद्याकीय सल्ला घ्या. गुंतवणूक करणे श्रेयस्कर आहे, पण त्यासाठी योग्य सल्ला घ्यावा. आपल्या जीवनसाथीचे आरोग्य हे तणावाचे आणि चिंतेचे कारण ठरू शकेल.

**धनु** – इतरांवर टीका करण्यात तुमचा वेळ वाया घालवू नका, त्याने तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे - परंतु तुमच्या हातातून पैसे सांडू देऊ नका. तुमचा मोकळा वेळ मुलांच्या सहवासात घालवा - मग त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा वेगळी क्लृप्ती करावी लागली तरी चालेल.

**मकर** – धर्मपरायण व्यक्तीचे शुभाशिर्वाद तुम्हाल मन:शांती मिळवून देतील. आर्थिक स्थिती चांगल्या प्रमाणात सुधारेल, मात्र त्याचवेळी खर्चाचे प्रमाण देखील वाढलेले असेल. आज घरात तुम्ही कुणालाही दुखवू नका आणि कुटुंबाच्या गरजा समजून घ्या.

**कुंभ** – आपल्या कुटुंबियांबरोबर वेळ घालवा, त्यामुळे आपल्या एकांतवास आणि एकटेपणावर मात करता येईल. तुमचे आई-वडिल तुमचा व्यर्थ खर्च पाहून आज चिंतीत होऊ शकतात आणि म्हणून तुम्हाला त्यांच्या रागाचे शिकार ही व्हावे लागू शकते.

**मीन** – तुमची संध्याकाळ काहीशा मिश्र भावनांमुळे तणावाची ठरू शकते. परंतु, चिंता करण्याचे कारण नाही - कारण निराशेपेक्षा आनंद-समाधान यामुळे तुम्ही खुशीत राहाल. आर्थिक स्थितीतील बदल हे नक्कीच होणार आहेत. कुटुंबिय अथवा मित्रांबरोबरील स्नेहमेळाव्यामुळे आजचा दिवस एकदम उत्तम आणि छान जाईल.

# लोकसभा निवडणुकीच्या निकालाआधी नागरिकांना दिलासा?




● महाराष्ट्र : लोकसभा निवडणूक २०२४ चा निकाल आज जाहीर होणार आहे. देशात ७ टप्प्यात तर महाराष्ट्रात ४८ मतदारसंघात ५ टप्प्यात मतदान झाले आहे. तर महाराष्ट्रातील ४८ जागांवर कोण बाजी मारणार हे आज जाहीर होईल. त्यामुळे संपूर्ण देशाचे लक्ष आज या निकालाकडे लागून राहिले आहे. सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात झाली आहे. तर लोकसभा निवडणूक २०२४ चा निकाल दरम्यान नागरिकांना दिलासा मिळणार का ? पेट्रोल-डिझेलचे दर घसरणार का? हे या लेखातून सविस्तर जाणून घेऊया.

लोकसभा निवडणुकीच्या निकालपूर्वी महाराष्ट्रातील काही शहरांत पेट्रोल-डिझेलचा दर कमी झालेला पाहायला मिळाला आहे. तर तुमच्या शहरात इंधनाचा भाव काय आहे ते खाली दिलेल्या तक्त्यातून पाहा… दररोज सकाळी ६ वाजता सरकारी तेल कंपन्या कच्या तेलाच्या किंमती जाहीर करतात. त्यानुसार प्रत्येक शहरातील पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती निश्चित केल्या आहेत. आता जून महिना सुरु झाला आहे. तर आजचे दर सुद्धा सकाळीच जाहीर झाले आहेत. पण, आज लोकसभा निवडणुकीच्या निकाल आहे. त्यामुळे नागरिकांचे लक्ष पेट्रोल-डिझेलच्या किमतीकडे लागून आहे.

महाराष्ट्रातील काही शहरांत पेट्रोल-डिझेलच्या किंमतींमध्ये सुधारणा झाली आहे. बीड, जळगाव, जालना, उस्मानाबाद, सांगली, सातारा या शहरांत पेट्रोलच्या किंमती कमी झाल्याचे पाहायला मिळालं आहे. तर अकोला, बीड, हिंगोली, सातारा या शहरांत डिझेलच्या किंमती कमी झाल्याचे चित्र दिसून येत आहे. तसेच काही शहरांत किंचित दरवाढ तर काही ठिकाणी मात्र पेट्रोल-डिझेलच्या दरात कोणताही बदल नोंदवला गेला नाही आहे. त्यामुळे नागरिकांना येत्या काही दिवसांत दिलासा मिळणार की त्यांचे ताण वाढणार हे पाहण्यासारखं असेल. लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यासाठी निवडणूक आयोगाची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूक आयोग सर्वात आधी पोस्टल मतांची मोजणी सुरु झाली असेल . त्यानंतर मग EVM मशीन उघडले जातील. प्रत्येक मतदारसंघात किती मतदान झालं आहे. त्यानुसार मतमोजणीच्या फेऱ्या होतील. एकंदरीतच संपूर्ण देशाचे लक्ष या निकालाकडे लागून राहील आहे. महाराष्ट्रातील ४८ जागांवर कोण बाजी मारणार याची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे.

## रामटेकमध्ये तब्बल दहा वर्षांनी काँग्रेसचा खासदार?




नागपूर : काँग्रेस विरुद्ध शिंदेंची शिवसेना असा थेट सामना झालेल्या रामटेक लोकसभा मतदारसंघांतून काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे यांनी पहिल्या फेरीपासून आघाडी घेतली आहे. पाच फेरीनंतर ७३ हजार ५५० मतांनी आघाडीवर आहेत. त्यामुळे सुरुवातीच्या मतमोजणीचा कल महाविकास आघाडीच्या बाजून असल्याचे दिसत आहे.

रामटेक मतदारसंघातून सलग दोन टर्म खासदार राहिलेल्या कृपाल तुमाने यांना डावलून ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या राजू पारवे यांना उमेदवारी देण्यात आली. पारवे यांची उमेदवारी शिंदे गटाला पसंत पडली नसल्याच्या चर्चा सुरुवातीपासून सुरु होत्या. त्यामुळे ही निवडणूक पारवे यांच्यासाठी कठीण जाणार असल्याची चर्चा रंगली होती. अशातच आता रामटेक मतदारसंघातील मतमोजणीचा सुरुवातीचा कल पारवे यांच्या विरोधात असल्याचं दिसत आहे.

या मतदारसंघातून सध्या काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे आघाडीवर असून प्रत्येक फेरीत आघाडीवर आहेत. परंतु, अंतिम निकालाचे चित्र स्पष्ट होण्यासाठी आणखी काही तास प्रतिक्षा करावी लागणार आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघ हा सुरुवातीपासून चर्चेचा ठरला आहे. काँग्रेसच्या उमेदवार रश्मी बर्वे याचं जातवैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्यामुळे ऐनवेळी त्यांच्याऐवजी त्यांचे पती श्यामकुमार बर्वे यांना मैदानात उतरावे लागले.

## ईव्हीएम यंत्रात घोळ

### श्रीराम पाटील यांचा आरोप; काही वेळानंतर पुन्हा मतमोजणी सुरू

● जळगाव : निवडणूक होऊन प्रदीर्घ काळ उलटूनही मतमोजणी यंत्रांमधील बॅटरी ही ९० टक्के चार्ज असल्याची बाब संशयास्पद असल्याचे नमूद करत रावेर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीराम दयाराम पाटील यांनी ईव्हीएम यंत्रावरच आक्षेप घेतल्याने खळबळ उडाली आहे. यामुळे रावेरची मतमोजणी थांबविण्यात आली आहे.

रावेर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीराम पाटील म्हणाले यांनी, मतदान यंत्रे एवढ्या दिवसांपासून ठेवूनही त्यांची बॅटरी ९९ टक्के कशी आहे, अशी शंका उपस्थित करीत रावेर लोकसभा मतमोजणीवर आक्षेप घेतला. ज्या मतदान यंत्राची बॅटरी ९९ टक्के आहे, त्या मतदान यंत्रात भाजपला आघाडी मिळत असून, दिवसभर यंत्रात मतदान झाले. एवढे असूनही मतदान यंत्रातील फक्त एक टक्का चार्ज कसे कमी होऊ शकते? असे प्रश्नही पक्षाचे उमेदवार श्रीराम पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांकडून उपस्थित



केले. त्यानंतर काही वेळ मतमोजणी थांबवण्यात आली. दरम्यान, आता पुन्हा मतमोजणी सुरू झाली असून, सहाव्या फेरीअखेर रक्षा खडसे यांना जवळपास ७५ हजारांचे मताधिक्क्य मिळाले आहे. मतदारसंघात तिसऱ्या फेरीची मतमोजणी सुरू असून, भाजपच्या रक्षा खडसे यांचे मताधिक्क्य वाढत आहे. अजून २३ फेऱ्यांपर्यंत पोहोचायचे आहे. कदाचित हे मताधिक्क्याची आघाडी अडीच लाखांपर्यंत जाऊ शकेल आणि हे चित्र पाहत असताना विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकलेली दिसत आहे. विरोधकांचे संतुलन बिघडलेले दिसत आहे.

## “वादळ छातीवर झेलण्याची ताकद शरद पवारांनी दाखवली”, अमोल कोल्हे यांची गर्जना

● लोकसभा निवडणुकीचे निकाल आज जाहीर होत आहे. महाराष्ट्रात पक्षफुटी, बंडखोरी या गोष्टींचा निवडणुकीवर परिणाम होईल असा अंदाज बांधण्यात आला होता. यासह बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण या विषयांना विरोधी पक्षांनी प्रचारात मांडत राज्य सरकारला घेरले होते. कदाचित या गोष्टी काही प्रमाणात महाविकास आघाडीला फायदेशीर ठरत असल्याचे दिसत आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार अमोल कोल्हे हे दुसऱ्या फेरीत आघाडीवर असल्याचे दिसून आले. यावर अमोल कोल्हे यांनी एबीपी माझ्याच्या प्रतिनिधीला प्रतिक्रिया दिली.

अजित पवार यांनी अमोल कोल्हे यांना आव्हान दिले होते. त्यावर विचारले असता, सर्वसामान्य कार्यकर्त्यांची मेहनत, तसेच जनतेने जो विश्वास दाखवला त्याचे प्रतिबिंब या निकालातून दिसून येत आहेत. आव्हाण कुणीही दिले तरी मतदान शिरून लोकसभा मतदारसंघातील जनता करणार होती आणि जनतेने तुतारीला साथ दिली, असे समाधान अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.



शिरूरप्रमाणे बारामतीत सुप्रिया सुळे पहिल्या फेरीत आघाडीवर दिसत असल्याच्या वृत्तावर त्यांनी आनंद व्यक्त केला. मी १८ ठिकाणी सभा घेतल्या. महाविकास आघाडीच्या बाजूने जनतेचा कल असल्याचे दिसले. काही ठिकाणी लक्ष्मीचे दर्शन, प्रशासनाच्या बाबतीत काही गोष्टी समोर आल्या. इतकं असताना जनतेचा आवाज दाबला जात नाही, हे दिसून आले, असे अमोल कोल्हे म्हणाले.

काही महिन्यांपूर्वी अजित पवार यांनी बंडखोरी करत आपल्या नेत्यांची वेगळी फळी उभी केली होती. हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या पथ्यावर पडतंय असं वाटतं का यावर, कुटुंब फुटणे ही गोष्ट योग्य नाही. मात्र विपरित परिस्थितीत शरद पवार यांनी जो संघर्ष उभा केला तो दाद देण्यासारखा आहे. वादळ छातीवर झेलण्याची ताकद शरद पवारांनी दाखवली, असे कौतुक अमोल कोल्हे यांनी केले.

## In Maharashtra, early trends show MVA leading Mahayuti



The initial trends for 48 Lok Sabha seats in Maharashtra shows a close contest with the Mahayuti (the BJP-NCP-Sena alliance) leading in 20 constituencies, while the Opposition Maha Vikas Aghadi (MVA) is ahead in 26, and Independents are leading in two While the counting continues, reports indicate that the BJP is leading in 20 seats and its alliance partners Shiv Sena, led by Chief Minister Eknath Shinde, in six seats. Meanwhile, the NCP led by Deputy CM Ajit Pawar is ahead in one seat. The NCP (SP) led by Sharad Pawar sprung a surprise by leading in at least nine out of the total 10 seats contested. Initial trends indicate that Baramati's sitting MP Supriya Sule was ahead of Ajit Pawar's wife Sunetra by over 8,000 votes as of 11.30 am. In Vidarbha, BJP's senior minister Sudhir Mungantiwar is trailing in Chandrapur against the Congress's Pratibha Dhanorkar. In the 2019 Lok Sabha polls, Chandrpaur was the lone seat that the Congress won.

## “गुलाल तेव्हाच उधळणार जेव्हा..” निकालांवर ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रकांत खैरेंची सावध प्रतिक्रिया

● आज १८ व्या लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होत आहेत. देशातील भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीसह काँग्रेस आणि अनेक विरोधी पक्षांमध्ये निकालाची धाकधूक आहे. महाराष्ट्रातही हिच परिस्थिती आहे. गेल्या २ वर्षांत येथे पक्ष फूट, बंड या सारख्या राजकारण ढवळून काढणाऱ्या घटना घडल्या असून त्याचे जोरदार प्रभाव राज्यातील लोकसभेच्या जागांच्या निकालांवर दिसून येईल असे अंदाज बांधले जात होते. त्यामुळे अनेक पक्षांचे नेते प्रतिक्रिया देताना सावधगिरी बाळगत आहे.

छत्रपती संभाजीनगर येथून महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी देखील निकालाबाबत बोलताना



सावध प्रतिक्रिया दिली. टीव्ही ९ मराठीशी बोलताना खैरे यांनी निकाल आपल्याच बाजून असल्याची पूर्ण खात्री झाल्यानंतरच गुलाल उधळणार असल्याची प्रतिक्रिया दिली.

जोपर्यंत प्रमाणपत्र हाती येत नाही, तोपर्यंत कोणीही काही करायचे नाही. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर घोषणा होईल त्यानंतर जल्लोष करा, गुलाल उधळा, अशी प्रतिक्रिया चंद्रकांत खैरे यांनी दिली.

सर्व वृत्त वाहिन्यांनी मी आघाडीवर आहे असे म्हटले असले तरी अतिआत्मविश्वास बाळगायचा नाही. मागच्या वेळ झालेली चूक होऊ देणार नाही. दिवसभर मतमोजणी केंद्रावर असणार. उद्धव ठाकरेंबाबद महाराष्ट्रात जबरदस्त वातावरण आहे. त्याचा फायदा होणार. छत्रपती संभाजीनगर हे केवळ बाळासाहेब ठाकरे यांचा गड आहे. गेल्यावेळी ज्याने हिसकावून घेतला, त्याने काहीच केले नाही, असे खैरे म्हणाले. भुमरेंचे आव्हाण उपयोगाचे नाही. त्यांनी खूप पैसे वाटले. त्यांनी स्वत:चे पैसे वापरले नाही, त्यांनी खोके घेतले, असा आरोप करत यंदा मतदाना उद्धव ठाकरे यांनाच मिळणार, असा विश्वास चंद्रकांत खैरे यांनी व्यक्त केला. मात्र विजयावर बोलताना आपण प्रमाणपत्र हाती येईपर्यंत जल्लोष करणार नाही, असे चंद्रकांत खैरे म्हणाले. छत्रपती संभाजीनगर लोकसभा जागेवर खैरे यांचा सामना एमआयएएमचे खासदार इम्तियाज जलील, शिवसेना शिंदे गटाचे संदिपान भुमरे यांच्याशी आहे. या तिघांमध्ये चुरशीची लढत पहायला मिळाली. पाणी, मराठी आरक्षण यासारख्या अनेक मुद्द्यांवर ही निवडणूक गाजली. या तिघांपैकी कोणाला विजय मिळतो, हे आता निकालातूनच कळणार.

## As Shahu Maharaj heads for victory, Congress to get an MP from Kolhapur after 25 years



● With Shahu Maharaj Chhatrapati establishing a sizeable lead of over 74,000 at the end of the 17th round of counting, the Congress is all set to have an MP from Kolhapur in Maharashtra after 25 years. Right from the postal ballot and first round of counting, Shahu Maharaj led over his nearest rival and sitting MP Sanjay Mandlik of the Shiv Sena, and his lead surged in every round.

Shahu Maharaj, the descendant of Chhatrapati Shivaji Maharaj, approached the counting centre in Kolhapur, where enthusiastic Congress workers smeared him with “gulal”. He asked them to wait until the counting was finished, saying, “Please wait for some more time.” Congress leader and former minister Satej Patil said, ”It was a big day for Congress in Kolhapur. At the end of the 14th round itself, it became clear that Shahu Maharaj would win, and we expect the momentum to continue. Shahu Maharaj's victory is certain for now.”

## Sukanta Majumder, Nisith Pramanik and Sandeshkhali's Rekha Patra among trailing BJP candidates



● As trends are emerging in Lok Sabha election results 2024, top BJP candidates in West Bengal including the party's state president, Sukanta Majumder, and Dilip Ghosh are trailing. In the first few rounds of counting, the BJP's star candidate in Tamluk, former Calcutta High Court judge Abhijit Gangopadhyay, was also trailing but he later surged ahead of his rivals. During the election campaign, both Prime Minister Narendra Modi and Union Home Minister Amit Shah said the BJP would get at least 30 of the 42 seats. But early trends, which show the saffron party leading in around 10 seats, suggest even its 2019 tally of 18 seats will be tough to achieve. As per the early trends, Dilip Ghosh, a former BJP state chief, is trailing in Burdwan-Durgapur and Sukanta Majumder is trailing in Balurghat. Union minister Nisith Pramanik is trailing in Cooch Behar. In Medinipur, BJP MLA Agnimitra Paul is trailing behind the TMC's actor-turned-politician June Maliya.

In the 2019 elections, the BJP won all seats in western and northern parts of Bengal. But this time, the ruling TMC is leading in more than one seat in these parts. Among Matua-majority constituencies such as Ranaghat, Krishnanagar, Bangaon, the BJP is leading in Ranaghat and Bangaon, both of which it won last time.

## शिंदे गटाला टफ फाईट देत ठाकरेंचे सर्व शिलेदार मुंबईच्या जागांवर आघाडीवर

● मुंबई: लोकसभा निवडणुकीच्या निकालाची उत्कंठा क्षणोक्षणी वाढत जातेय. मतमोजणीदरम्यान होणाऱ्या आकडेवारीचा आलेख कमी जास्त होत असला तरीही दुपारच्या सत्रात आता चित्र जवळपास स्पष्ट होतंय. मुंबईतील सहा मतदारसंघ हे दोन्ही शिवसेनेसाठी अत्यंत महत्त्वाचे होते. या मतदारसंघांमध्ये ठाकरे गटाची चांगली कामगिरी दिसू येतेय. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार ठाकरे गटाने सर्व ४ जागांवर आघाडी घेतली आहे. तर, शिंदे गटाच्या मुंबईतील सर्व जागा पिछाडीवर आहेत.

मुंबईतील चार जागा ठाकरे गटाच्या पारड्यात पडल्या होत्या. त्या सर्व जागांवर ठाकरे गट आघाडीवर असल्याचं चित्र आहे. मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदारसंघातून ठाकरे



गटाचे संजय दीना पाटीलआघाडीवर असून त्यांना २ लाख ८० हजार ७१ मते आतापर्यंत मिळाली आहेत. तर भाजपाचे मिहिर कोटेचा २३ हजार २१८ मतांनी पिछाडीवर आहेत.

मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे उमेदवार अमोल किर्तीकर यांनी आघाडी घेतली आहे. त्यांना आतापर्यंत २ लाख २९ हजार ५०९ मते मिळाली आहेत. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून अरविंद सावंत यांनीही चांगली आघाडी घेतली आहे. त्यांना २ लाख १२ हजार ७२९ मते मिळाली असून शिंदे गटाच्या यामिनी जाधव या ६१ हजार ७९४ मतांनी पिछाडीवर आहेत. दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघातून अनिल देसाई यांना ३ लाख ४० हजार ९३२ मते आतापर्यंत मिळाली असून राहुल शेवाळे ४८ हजार मतांनी पिछाडीवर आहेत.

## महाराष्ट्रात किती टक्के मतदान

● राज्यातील ४८ मतदारसंघांसाठी एकूण पाच टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडली. १९ मे रोजी पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात रामटेक, नागपूर, भंडारा गोंदिया, गडचिरोली चिमूर, चंद्रपूर या पाच मतदारसंघांत मतदान झाले. पहिल्या टप्प्यात ६३.७१ टक्के नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाचा दुसरा टप्पा २६ एप्रिल रोजी पार पडला. या दिवशी , बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ वाशीम, हिंगोली, नांदेड, परभणी या आठ मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडली. या दुसऱ्या टप्प्यात ६२.७२ टक्के मतदान झाले. तिसरा टप्पा सात मे रोजी झाला असून रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले अशा ११ लोकसभा मतदारसंघात ६३.५५ टक्के मतदारांनी मतदान केले. १३ मे रोजी झालेल्या चौथ्या टप्प्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी, बीड या लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले. या मतदारसंघांमध्ये एकूण ६२.२१ टक्के मतदारांनी मतदान केले. तर २० मे रोजी शेवटच्या टप्प्यात धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण अशा एकूण १३ मतदारसंघांत मतदान झाले. यावेळी ५६.८९ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

# कल्याण मधून श्रीकांत शिंदे यांचा मोठा विजय,
## 2 लाखाच्या मताधिक्याने ठाकरे गटाचा उमेदवार पराभूत...

● ठाणे, प्रतिनिधी :

ठाणे जिल्ह्यातील कल्याण मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष लागलं होतं. या मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे हे निवडणुकीत उभे होते. या मतदारसंघात श्रीकांत शिंदे यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघात श्रीकांत शिंदे यांना ४ लाख ३९ हजार ९६६ मते पडली तर मविआच्या उमेदवार वैशाली दरेकर यांना २ लाख ३४ हजार ४८८ मते पडली. या मतदारसंघात जवळपास २ लाखांच्या मताधिक्याने श्रीकांत शिंदे विजयी झाले आहेत. ठाणे आणि कल्याण या मतदारसंघाची लढाई प्रतिष्ठेची होती. कुठल्याही परिस्थितीत एकनाथ शिंदेंचा पराभव करण्यासाठी उद्धव ठाकरेंनी प्रयत्न केले होते. परंतु ठाणे आणि कल्याणमध्ये शिंदेंच्या शिवसेनेने बाजी मारल्याचं दिसून येते.




कल्याण लोकसभा मतदारसंघात २०१९च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा चार टक्के जास्त म्हणजे ५०.१२ टक्के मतदान झालं होतं. या ठिकाणी २० लाख ८२ हजार २२१ मतदारांपैकी १० लाख ४३ हजार ६१० मतदारांनी मतदान केलं होतं. महायुतीचा बालेकिल्ला असलेल्या डोंबिवली, कल्याण ग्रामीण, उल्हासनगर मतदारसंघांच्या तुलनेत मुंब्रा-कळवा परिसरात झालेले मतदान महायुतीला चिंतेत टाकणारे होते. कळवा मुंब्रा येथून २ लाख १६ हजार १५९, तर कल्याण ग्रामीणमधून २ लाख ३१ हजार १६२ आणि कल्याण पूर्वमधून १ लाख ५६ हजार २३५ मतदारांनी मतदान केले आहे. ही सर्वाधिक मते असून, डोंबिवलीत १ लाख ४२ हजार १४२, उल्हानसगर १ लाख ३१ हजार ५०५, तर अंबरनाथमध्ये १ लाख ६६ हजार ४०७ मतदान झाले होते. त्यात आज निकालात श्रीकांत शिंदे यांना सुरुवातीपासून आघाडी मिळाली. शेवटच्या टप्प्यापर्यंत ही आघाडी २ लाखांच्यावर पोहचली. दरम्यान, एकूण मतदानाच्या टक्केवारीनुसार, ६०.२९ टक्के मते श्रीकांत शिंदे यांच्या पारड्यात पडली तर वैशाली दरेकर यांना ३२.१७ टक्के मते मिळाली. या मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीनेही शाहबुद्दीन शेख सुलेमानी यांना तिकीट दिले होते. त्यांना १५ हजार ४६० मते पडली



ठाणे - २५ ठाणे लोकसभेची मतमोजणी सुरू असतानाचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी आढावा घेतला

# सातार्‍यात तेराव्या फेरीनंतर श्री. छ .खा उदयनराजेंना सापडला विजयाचा मार्ग




● सातारा, प्रतिनिधी :

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या ४५- सातारा लोकसभा मतदारसंघात १६ उमेदवार होते. त्यापैकी महायुती व महाविकास आघाडी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट पुरस्कृत उमेदवार अशा तीन उमेदवारांमध्ये चांगली लढत झाली यामध्ये तेराव्या मतमोजणी फेरीनंतर महायुतीचे उमेदवार श्री छ उदयनराजे भोसले यांना विजयाचा मार्ग सापडला त्यांना एकूण पाच लाख ७१ हजार १३४ तर त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार श्री शशिकांत शिंदे यांना पाच लाख ३८ हजार३६३ तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे पुरस्कृत संजय गाडे यांना ३७ हजार ६२ मते मिळाली. यामध्ये उमेदवार पसंत नसलेल्या नोटासाठी ५६२२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला एकूणच या अटीतटीच्या निवडणुकीत श्री छ खा भोसले यांचा ३२ हजार७७१ मताने विजयी झाल्याची घोषणा सायंकाळी करण्यात आली.

तसेच त्यांना सातारा जिल्हा अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री जितेंद्र दुडी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. सातारा येथील औद्योगिक वसाहती मधील शासकीय गोदाम या ठिकाणी सातारा लोकसभा मतदारसंघासाठी स्वातंत्ररित्या सहा विधानसभा मतदार संघाची मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरू करण्यात आली.

सुरुवातीला उमेदवारांचे प्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये सर्व ईव्हीएम यंत्रणा आणण्यात आल्या. यासाठी वेगवेगळे पद्धतीने कोतवाल यांना ड्रेस कोड देण्यात आले होते. तसेच सर्व ईव्हीएम यंत्रणेसाठी विशेष कॅमेरा व निवडणूक अधिकाऱ्यांसोबतच वरिष्ठ अधिकारी कर्मचारी यांनी मतमोजणीला सुरुवात केली

आठ वाजून ४५ मिनिटांनी पहिल्या फेरीचे मतमोजणी पूर्ण होऊन सुरुवातीलाच महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी आघाडी घेतली. ही आघाडी थेट तेरा फेरीपर्यंत कायम राहिल्यामुळे सातारा शहर व परिसरात शांततेचे वातावरण होते एवढेच नव्हे तर अनेक प्रसारमाध्यमचे प्रतिनिधी यांनी सुद्धा या मतमोजणी केंद्रामधील प्रिंट व मीडिया कक्षेमध्ये उत्सुकता ताणली गेली होती.

त्यानंतर तेराव्या फेरीमध्ये सातारा जावली विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणीला सुरुवात होताच महायुतीचे उमेदवार श्री छ खा भोसले यांना अपेक्षितरित्या मतमोजणी मध्ये आघाडी मिळाली. आणि सातारा शहरातील रस्ते गर्दीने फुलून जाण्या स सुरुवात झाली.

ही आघाडी २३ व्या फेरीपर्यंत कायम राहिली. मतमोजणीच्या दिवशी दुपारी साताऱ्यातशांतता व रस्त्यावर तुरळक गर्दी असताना अचानक श्री छ खा भोसले यांच्या विजयाची नांदी लागली .अनेक हौसे- नवसे- गवसे यांनी रस्त्यावर येऊन आनंद उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली.

सातारा शहर परिसरात १४४ कलम व जमावबंदीचा आदेश तसेच वाद्य वाजवण्यास परवानगी नसतानाही मोठ्या प्रमाणात डी.जे व रस्त्यावर जे.सी.बी. आणून शिवतीर्थावर मोठी गर्दी झाली होती .या गर्दीला नियंत्रण करणे वाहतूक पोलीस व सातारा पोलिसांना अक्षरशा अपयश आले होते. याबाबत श्री छ खा उदयनराजे भोसले यांचे कट्टर समर्थक माजी आमदार डॉक्टर दिलीप येळगावकर यांनी सुद्धा या विजयाबद्दल आनंद उत्सव साजरा केला. साताऱ्यातील झालेल्या गर्दी बाबत त्यांना विचारणा केली असता एवढ्या मोठ्या प्रमाणात जर गर्दी झाली असेल व त्यांनी जर मतदान केले असेल तर एक लाख मताधिक्याने उदयनराजे निवडून आले पाहिजे होते असे त्यांनी ठामपणे सांगितले. शेवटी विजयला अनेक वाटा असतात. पण पराभवाला एकच वाट असते महाविकास आघाडीचे उमेदवार व प्रचारक यांनी चांगल्या पद्धतीने लढत दिली आहे. या स्मरणीय लढतीमुळे खऱ्या अर्थाने सातारा लोकसभा मतदारसंघाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले आहे. जय पराजय अपेक्षा साताऱ्यातील निवडणूक ही चांगलीच गाजली. महायुतीच्या चार आमदारांनी प्रामाणिकपणाने समर्थकांसोबत काम केल्यामुळे श्री छ खा भोसले यांचा मार्ग



तेराव्या फेरीत सुरू झाला. त्यामुळे आमदार व त्यांच्या समर्थकांनी सुद्धा आनंदात सहभागी होण्यास सुरुवात केली. सातारा येथील या निवडणुकीचे खास वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीला महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांना मतमोजणी मध्ये आघाडी मिळाल्यामुळे अति उत्साही कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी व गुलालाची उधळण करत आनंद उत्सव साजरा केला तर सायंकाळी विजयी उमेदवार श्री छ खा भोसले यांच्या समर्थकांनी रस्त्यावर येऊन मोठा जल्लोष केला विशेष म्हणजे महाराष्ट्रात प्रथमच जय पराजय झालेल्या उमेदवारांचा जल्लोष पाहून नेमकं काय घडले हे पाहण्यासाठी अनेकजण संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होता मीडिया कक्षेमध्ये देशभरातील निकाल पहिल्या फेरीपासून समजत होते परंतु सातारा लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी व त्याची माहिती लवकर मिळत नसल्याने अनेक जण आपापल्या सहकाऱ्यांना संपर्क साधून विचारणा करत होते अखेर सायंकाळी या निवडणुकीचे सर्व मतमोजणी पूर्ण झाली आणि कोणताही अनुचित प्रकरण घडल्यामुळे पोलीस यंत्रणेचा ही ताण कमी झाला. सदरची निवडणूक ही चांगलीच गाजली असली तरी याबाबतचे आता अनेकजण विश्लेषण करतील पण खऱ्या अर्थाने तिसऱ्या तिसऱ्या उमेदवाराची तुतारी ही या विजयाची शिल्पकार ठरल्याची ही चर्चा सुरू झालेली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे उमेदवार श्री संजय कोंडीबा गाडे यांच्यासह अनेक उमेदवारांना मते मिळाले असली तरी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत कदम यांना अवघी ११,९१२ मते मिळाल्यामुळे वंचितचा करिष्मा दिसून आला नाही. हे सुद्धा स्पष्ट झाले आहे.



ठाणे - ठाण्यातील घोडबंदर रोडवरील आनंदनगर येथील होरायझन शाळेत २५ ठाणे लोकसभेची मतमोजणी सुरू असतानाचे छायाचित्र.

# भाजप उरण तालुका महिला मोर्चा उपाध्यक्ष अरुणाताई घरत यांचा वाढदिवस साजरा

● उरण , प्रतिनिधी :



उरण तालुक्यातील जासई गावच्या भाजप उरण तालुका महीला मोर्चा उपाध्यक्ष अरुणा घरत यांचा वाढदिवस साजरा या प्रसंगी उरणचे आमदार ..महेश बालदी यांनीअरुणाताई घरत यांना शुभेच्छा दिल्या भाजपा उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर भाजपा उरण तालुका महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे , ,,माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, भाजपा उरण तालुका उपाध्यक्ष .मुकुंद गावंड, जासई विभाग महिला अध्यक्ष शमीता ठाकूर, आवरे पंचायत गण अध्यक्ष अजित पाटील, दिघाटी माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमित पाटील, पिरकोन माजी सरपंच व विद्यमान सदस्य के.वाय गावंड, शिक्षण संघटक अजित जोशी सर आणी मनसे संघटक नितिन म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.





ठाणे - ठाणे लोकसभा मतदार संघातून शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा विजय झाल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हस्के यांना मतमोजणी केंद्रावर जाऊन शुभेच्छा दिल्या तर केंद्र बाहेर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.